दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २२८ । सोमवार १ जून २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




'सहजयोग'
भाग ६८

**भोळेपणा....** जे लोक स्वतःला फार मोठे शास्त्रज्ञ, शिकलेले, सुशिक्षित आणखीन आचार्य वगैरे समजतात, त्यांच्यामध्ये सहजयोग घुसत नाही. असे मी पुष्कळ विद्वान पाहिले आणि एक साधारण मनुष्य ज्याला धड कपडा नाही, खायला नाही अशा माणसामध्ये सहजयोग सहजच घुसतो. शिक्षणाने परमेश्वर जाणता येत नाही. असे म्हटल्याबरोबर सगळे शिक्षणाचे अधिकारी मला मारायला उठतील. शिक्षणाने संसारातील सर्व लौकिक गोष्टी जाणता येतील. पण परमेश्वराच्या कार्याला जाणण्यासाठी दुसरे मार्ग पाहिजेत. दूसरे गुण पाहिजेत. पैकी मुख्य गुण म्हणजे भोळेपणा. ज्याला इंग्लिश भाषेमध्ये इनोसन्स म्हणतात. लहान मुलांमध्ये असतो बघा भोळेपणा. काही काही मोठी माणसेपण फार भोळी असतात हो! ठगविली जातात ती. अशा लोकांना लोक त्रासही जास्त देतात. छळतातही फार ! म्हणूनच सगळ्या संत लोकांना फार छळलंय या जगाने आणि आज ही छळताहेत. याचेच रडू येते कधी, कधी. आपण जी मंडळी पार झालात ती सुद्धा संत मंडळी आहात. संतच नव्हे तर देवता स्वरूप आहात. आज देवतांच्या ठिकाणी तुम्ही आलात.देव जागवले गेलेत आपल्यामध्ये. हे देवपण आलेले आहे आपल्यामध्ये. तुम्हाला बालेकिल्ला दिलेला आहे जो तुमच्याच आतमध्ये आहे. तो म्हणजे निर्विचार स्थिती. थॉटलेस अवेअरनेस. तुम्ही जर त्या किल्ल्यात बसलात तर कोणाची हिम्मत नाही तिथे पाय ठेवायची! हे लक्षात ठेवा.

मुंबई, २२ जानेवारी १९७५ अधिक माहितीसाठी
www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..



### दारू विक्रीच्या तक्रारींकडे पोलिसांचे दुर्लक्ष: नीलम गोऱ्हे

पिंपरी : दापोडी, फुगेवाडी परिसरातील दारू विक्रीच्या स्थानिक नागरिकांच्या आणि लोकप्रतिनिधींच्या धीं तक्रारींकरीं डे पोलिसांनी वेळीच लक्ष दिले असते, तर हा जीवघेणा अनर्थ टाळता आला असता. पोलिसांनी तक्रारींकरीं डे दुर्लक्ष केल्याचा आरोप आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केला. फुगेवाडीतील विषारी दारूमुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या क्तीं कुटुंबाची गोऱ्हे यांनी रविवारी भेट घेतली. त्या म्हणाल्या, 'शिवसेनेचे (शिंदे) फुगेवाडी-दापोडीचे शाखाप्रमुख निलेश हाके यांनी यापूर्वीच या परिसरातील अवैध दारूविक्रीचा आणि भयंकर परिस्थितीवर आवाज उठविला होता. लोकप्रतिनिधी आणि स्थानिक कार्यकर्ते वारंवार ओरडून सांगत असतानाही, जर वेळीच योग्य आणि कडक कारवाई झाली असती, तर आज अनेक निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले नसते'. असे गोऱ्हे म्हणाल्या.

# विराटची विरासत...



- आरसीबी पुन्हा आयपीएलची बादशाह!
- सलग दुसऱ्यांदा ट्रॉफीवर नाव कोरत बेंगलोरचा इतिहास
- कोहलीच्या दमदार खेळीने चाहत्यांचा जल्लोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहमदाबाद :** क्रिकेटविश्व ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, त्या आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर (आरसीबी) संघाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध करत सलग दुसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरले. विराट कोहलीच्या तडाखेबंद आणि जबाबदारीपूर्ण फलंदाजीच्या जोरावर आरसीबीने गुजरात टायटन्सवर मात करत विजेतेपद कायम राखले. या विजयासह आरसीबीने केवळ ट्रॉफी जिंकली नाही, तर देशभरातील कोट्यवधी चाहत्यांची मनेही पुन्हा एकदा जिंकली.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या महामुकाबल्यात आरसीबी आणि गुजरात टायटन्स यांच्यात रंगलेली लढत शेवटपर्यंत उत्कंठावर्धक ठरली. मात्र निर्णायक क्षणी विराट कोहलीने आपल्या अनुभवाची आणि क्लासची झलक दाखवत संघाला विजयाच्या दिशेने नेले. मोठ्या सामन्यांचा खेळाडू म्हणून **(पान ४ वर)**

# दोन दिवसात सातारा गॅझेट काढणार

## सर्व मागण्या मान्य : मनोज जरांगे पाटलांचे आंदोलन स्थगित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** सरकारने सर्व मागण्या मान्य करण्याचे लेखी दिल्यानंतर जालन्यातील अंतरवाली सराटीत मराठा आरक्षणासाठी सुरू केलेले उपोषण मनोज जरांगे पाटील यांनी अखेर मागे घेतले. काल रात्री मराठा आरक्षण अभ्यासक आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात सकारात्मक चर्चा झाली. दोन दिवसात सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात



अध्यादेश काढण्यासह अभ्यासकांच्या सूचवलेल्या दुरुस्त्या सरकारने मान्य केल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी रात्री साडेदहा वाजता जरांगे पाटलांची भेट घेतली. सकारात्मक चर्चेनंतर मनोज जरांगेंनी मध्यरात्री १.१५ वाजता पाणी पिऊन उपोषण मागे घेतले.

शासन निर्णय काढण्यासाठी मनोज जरांगेंनी सरकारला मंगळवारपर्यंतची मुदत दिली आहे. तसंच शासन निर्णय न दिल्यास पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशाराही मनोज जरांगेंनी दिला. आमच्या मागण्यांवर सरकारने दिलेल्या ड्राफ्टवरून मंगळवारपर्यंत (२ जून) **(पान ४ वर)**

### मराठा समाजाला न्याय मिळेल, ओबीसींवर अन्याय नाही

सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक आहे. सरकारची भूमिका पारदर्शक आहे. आम्ही सकारात्मक काम करणारे लोक आहे. आम्ही समाजांना एकमेकांसमोर आणून भांडत नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. तसेच आम्ही समाजाच्या हिताचे निर्णय घेतो. परंतु त्याचवेळी संविधान आणि न्ययालयाच्या निर्णयाच्या आधिन राहून निर्णय घेतो. आम्ही एका समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देत नाही. ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, त्यांनी घाबरायचे कारण नाही. न्यायालयाच्या चौकटीत बसून निर्णय घेणार आहोत.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# शिर्डी-नाशिक महामार्गावर मृत्यूचा थरार...

### दोन सख्ख्या भावांचा जागीच अंत! निंभेरे गाव शोकसागरात : श्रीरामपूरच्या बहिणींसह ११ जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी / झरेकाठी :** रविवारचा दिवस अनेक कुटुंबांसाठी आनंदाचा ठरतो. मात्र राहुरी तालुक्यातील निंभेरे गावासाठी हा रविवार आयुष्यभराची वेदना देऊन गेला. शिर्डी-नाशिक महामार्गावरील सावळीविहीर खुर्द परिसरात झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला, तर ११ जण गंभीर जखमी झाले. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून निंभेरे गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.
मृतांमध्ये महेश काशिनाथ कांबळे आणि विशाल काशिनाथ कांबळे या दोन सख्ख्या भावांचा समावेश आहे. दोघेही आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ होते.





अचानक झालेल्या या दुर्घटनेने त्यांच्या कुटुंबीयांवर आणि गावकऱ्यांवर शोककळा पसरली आहे.
दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास पनवेलहून शिर्डीकडे येणारी राज्य परिवहन महामंडळाची बस (एम एच १४ एलएक्स ८९५१) सावळीविहीर खुर्द परिसरातील ब्रँच चारीजवळ पोहोचली होती. त्याचवेळी शिर्डीकडून सिन्नरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या इर्टिगा कारने (एमएच १७ डीजे ७८१८) बसला समोरासमोर जोरदार धडक दिली.**(पान ४ वर)**

# उक्कलगावसह परिसराला गारपिटीने झोडपले

- भाजीपाल्यासह अन्य डाळींब पिकांचे नुकसान
- उक्कलगाव परिसराची बत्तीगुल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** वादळी वाऱ्यासह परिसरात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. सध्या परिसरात प्रचंड गारांचा पाऊस पडल्याने शेतकऱ्याची तारांबळ उडाली होती.रविवारी (दि. ३१) मे रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास पावसाने हजेरी लावली होती. चक्क काही तर,गावात म ोठ्या प्रमाणावर गारपीट झाल्याने रब्बी पिकांचे भाजीपाला मोठे नुकसान झाले होते. श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर, उक्कलगाव, एकलहरे, आठवाडी, गळनिब, या गावासह, राहूरी तालुक्यातील आंबी, केसापूर, दवणगाव, संक्रापूर, गंगापूर, आदीसह गावात मे महिन्यात शेवटच्या क्षणी अवकाळी पाऊसाने जोरदार हजेरी लावली होती.यात गारांचा साधारणता अंदाजे गोटी एवढया गोल गारा पडल्या आहेत.अवकाळी पावसाने मे महिन्यात शेवट क्षणाला दणका दिला.





जून महिना सुरू होण्याआधी बेमोसमी अवकाळी पावसाने पिकांचे परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काहीच भागात डाळिंबसह भाजीपाला पिकांना फटका बसला आहेत. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरवला आहे.आधीच शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव नाही, त्यात काढणीला आलेल्या पिके हातातून निघून जात आहेत.यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहेत.त्यामुळे तातडीने नुकसान झालेल्या परिसराचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून उन्हाच्या चढाओढीनंतर परिसरातील वातावरणात अचानक मोठा बदल झाला होता.शहरासह ग्रामीण भागाचे तापमान ४२ अंश.से.नोंद झाली होती, उक्कलगाव, संक्रापूर,केसापूर, एकलहरे,आंबी, या प्रवरा परिसरात तर पावसाने जोरदार अक्षरशः बॅटिंग केली.मात्र पुढील ४८ तास जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, वादळी वाऱ्यासह गारपिटीची दाट शक्यता हवामान विभागाने वर्तवली जात आहेत.एप्रिल – मे महिन्याच्या सुरुवातीलाच उक्कलगावकरांना निसर्गाच्या लहरीपणाचा चांगलाच अनुभव आला.याच परिसरात वादळी वाऱ्यामुळे उक्कलगाव –गळनिंब झाडे कोसळल्याच्या तर, द्राक्ष बागेचे पोल वाकल्याचे घटना समोर आल्या आहेत. बेलापूरगावचा रविवारचा आठवडे बाजार सुरू असताना सायंकाळी जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबर व्यवसायिकाची तारांबळ उडाली.सायंकाळी सात वाजेच्या दरम्यान, वीजपुरवठा खंडित झाला.

### देवळाली प्रवरा ते श्रीरामपूर ररत्यावर लिंबाचे झाडं कोसळले, वाहतुक खोंबळली

देवळाली प्रवरा – श्रीरामपूर ररत्यावर नरसाळी शिवारात लिंबाचे सुसाट वाऱ्याने लिंबाचे झाडे रसत्यावरच कोसळले होते.त्यामुळे काहीकाळ वाहतूक ठप्प झाली.राहूरीकडे –जाणारी वाहतूक उक्कलगाव –कोल्हारमार्गे राहूरीकडे – अहिल्यानगरकडे वळवली.उशिरा रविवारी सायंकाळी झाड काढण्याचे प्रशासनाचे शर्तीचे प्रयत्न सुरू केले. त्यामुळे कोणतीही जिवितहानी झाली नसल्याचे सांगण्यात आले.

### प्रशासनचा 'येलो अलर्ट' जारी

भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये (दि.३१) मे ते (दि.०३ ) जूनपर्यंत या कालावधीत विजेच्या कडकडाटांसह वादळे, गारांचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा शक्यता वर्तविण्यात आलेली असून, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी येलो अलर्ट प्रसारीत करण्यात आलेला आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील तमाम नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत सुचना केल्या आहेत.

### पाचेगाव परिसरात हलक्या सरी कोसळल्या

नेवासा तालुक्यातील पाचेगाव बेलपिपळगाव पुनतगाव परिसरात रविवारी पावसाने हजेरी लावली होती.मात्र वारे वेगाने वाहत होते. वीजप्रवाह खंडित झाला होता.

### भावगीतांची सुरसम्राज्ञी सुमन कल्याणपूर यांचे निधन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** संगीत जगतातून अत्यंत दुःखाची आणि मनाला चटका लावणारी बातमी समोर आली आहे. आपल्या मधुर आणि सुश्राव्य आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांचे निधन झाले. वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला असून संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. मराठी भावगीत, भक्तिगीत आणि हिंदी चित्रपट संगीतात त्यांनी दिलेले योगदान कधीही न विसरता येणारं आहे. कला क्षेत्रातील त्यांच्या अफाट कामगिरीची दखल घेऊन केंद्र सरकारने २०२३ साली त्यांना 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने सन्मानित केलं होतं. सुमन कल्याणपूर **(पान ४ वर)**


# लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिला अपात्र?

## सुषमा अंधारे यांची टीका : सरकारची 'गरज सरो वैद्य मरो' वृत्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पात्र महिलांना इ-केवायसी करण्याकरता मुदत देण्यात आली होती. मात्र, ही मुदत आता संपुष्टात आली असून या छाननी प्रक्रियेतून तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्या असल्याची माहिती शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी दिली. त्यामुळे, अपात्र महिलांना आता या योजनेअंतर्गत देण्यात येणारा १५०० रुपयांचा सन्मान निधी दिला जाणार नाही.

लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी म हिलांच्या संख्येत वेगाने कपात करण्यात आली. अडीच कोटींवरून ही संख्या १ कोटी ७५ लाखांपर्यंत खाली आली. अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या सुमारे ८० लाख महिला या योजनेतून वगळण्यात आल्याचा आरोप करीत शिवसेनेच्या (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सरकारची ही वृत्ती गरज सरो वैद्य मरो अशी असल्याची जोरदार टीका केली. सरकारसह महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. **(पान ४ वर)**



**हा ८० लाख हा आकडा छोटा नाही. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रा तील प्रत्येक भगिनीस 'लाडकी बहीण' योजनेचे लाभ नियमितपणे मिळालेच पाहिजेत अशी आमची भूमिका आहे. यासाठी त्यांना विशिष्ट मुदतीत केवायसी करण्याची आडकाठी असू नये. राज्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी त्यांना केवायसी करण्याची संधी कायम उपलब्ध करून द्या.**

**खा. सुप्रिया सुळे**

# चौंडी विकास आराखड्यास निधी कमी पडू देणार नाही : एकनाथ शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. हे सरकार जे बोलते ते करून दाखवते. चौंडी विकास आराखड्यासाठीही निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज, रविवारी चौंडी येथे बोलताना सांगितले. 'लाडकी बहीण' योजना बंद होणार नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त, त्यांचे जन्मस्थळ असलेल्या चौंडी येथे अभिवादन सभेत उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री दत्तात्रय भरणे, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, खासदार रामराव वडकुते, माजीमंत्री अण्णासाहेब डांगे, आमदार गोपीचंद पडळकर तसेच जिल्ह्यातील आमदार व पदाधिकारी उपस्थित होते.





उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर न्याय व स्त्रीशक्तीच्या प्रतीक होत्या. त्यांचे चरित्र स्फूर्ती देणारे आहे. त्या युगप्रवर्तक व त्यांचा राज्यकारभार **(पान ४ वर)**

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची उमेदवारी जाहीर

## विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी केली घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** बऱ्याच दिवसापासून चर्चिल्या जाणाऱ्या विषयाला नुकताच च मुंबईम ध्ये भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भाजपात प्रवेश केला. आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले लगेचच राहुरी तालुक्यासह मतदार संघातील कार्यकर्त्यांनी मोठा जोश करीत आनंद व्यक्त केला.



काल भाजपा प्रवेश सोहळ्याच्या वेळेस प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी आपल्या भाषणात प्राजक्त तनपुरे यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही व भाजपाची पूर्ण ताकद त्यांच्या पाठीशी राहील असे बोलून त्यांना विधान परिषदेचे तिकीट देण्याचे संकेत दिले होते. या सोहळ्याला २४ तास होत नाही तेच विधान परिषदेचे सभापती नामदार राम शिंदे यांनी अहिल्यानगर विधान परिषदेचे महायुतीचे भाजपाचे उमेदवार प्राजक्त तनपुरे हे असतील अशी घोषणा केल्याने मतदार संघात एकच जल्लोष करण्यात आला.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी प्राजक्त तनपुरे यांचे उमेदवारीचे नाव घोषित केल्यामुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

महायुतीने प्राजक्त तनपुरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने राजकीय मीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून विरोधकांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दिवसेंदिवस आता रंग भरला जात आहे. त्यामुळे ही निवडणूक मोठ्या चुरशीची होणार अशी चिन्हे आता दिसत आहेत. व भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी विधान**(पान ४ वर)**

### दत्ता पानसरे सामान्यांचा उमेदवार..!

जिल्हाभरातील नगरसेवकांमधून उमेदवारीबाबत उत्सुकता आहे. विधान परिषदेचा उमेदवार हा नगरसेवकांच्या संपर्कातला असावा, अशी सर्वांची इच्छा आहे. त्यामुळे श्रीगोंदा येथील ज्येष्ठ नेते दत्ता पानसरे यांनी निवडणूक लढवावी, असा आग्रह जाणकार नगरसेवकांकडून केला जात आहे. त्यांच्या निर्णयाकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



# मराठा आरक्षण : 'सावध माघार' आणि बदलणारे सामाजिक समीकरण

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासात मैलाचा दगड ठरलेले मराठा आरक्षणाचे आंदोलन एका अत्यंत संवेदनशील व वळणावर येऊन पोहोचले आहे. राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष नामदार राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मराठा आंदोलनाचे केंद्रबिंदू मनोज जरांगे-पाटील यांच्याकडे मागण्या मान्य केल्याचा अधिकृत मसुदा सुपूर्द केला. या मसुद्यावर समाधान व्यक्त करत जरांगे-पाटील यांनी तूर्त आपले आंदोलन स्थगित केले असले, तरी ''मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा रस्त्यावर उतरू,'' असा गर्भित इशारा देत घेतलेली 'सावध माघार' बरेच काही सांगून जाणारी आहे. या सर्व घडामोडींवर सत्ताधारी, विरोधक आणि ओबीसी समाजघटकांकडून उमटलेल्या संमिश्र प्रतिक्रिया केवळ राजकीय नसून, त्या भविष्यातील सामाजिक संघर्षाची नांदी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. दैनिक 'राष्ट्र सह्याद्री'च्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राच्या आरशातून जेव्हा आपण या संपूर्ण पटाकडे पाहतो, तेव्हा या आंदोलनाचा आणि शासनाच्या भूमिकेचा महाराष्ट्राच्या समाजजीवनावर, विशेषतः ग्रामीण भागातील ताण्याबाण्यांवर काय दूरगामी परिणाम होईल, याचे सखोल विवेचन करणे गरजेचे ठरते.

**ग्रामीण अर्थकारण, शेती आणि आरक्षणाची अपरिहार्यता**

मराठा आरक्षणाच्या या संपूर्ण आंदोलनाची पाळेमुळे चाचपडताना आपल्याला थेट ग्रामीण महाराष्ट्राच्या ढासळत्या अर्थकारणाकडे जावे लागते. 'राष्ट्र सह्याद्री'चे वाचक ज्या मातीशी जोडलेले आहेत, तिथे कोरडवाहू शेती, निसर्गाचा लहरीपणा, कोसळलेले शेतीमालाचे भाव आणि डोक्यावर असणारे कर्जाचे डोंगर यांमुळे मराठा समाजातील मोठा तरुण वर्ग हवालदील झाला आहे. शेती आता परवडणारी राहिलेली नाही आणि उद्योग-धंद्यांचे जाळे ग्रामीण भागात पोहोचलेले नाही. अशा परिस्थितीत 'सरकारी नोकरी आणि हक्काचे शिक्षण' हाच एकमेव आर्थिक सुटकेचा मार्ग ग्रामीण तरुणांना दिसतो आहे.

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला ग्रामीण भागातून, विशेषतः मराठवाडा, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतून जो अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला, तो केवळ भावनिक नव्हता. तो आर्थिक विवंचनेतून आलेला आक्रोश होता. शासनाने मसुदा देऊन या आक्रोशाला तात्पुरती शांतता दिली असली, तरी मूळ प्रश्न अद्याप सुटलेला नाही. आरक्षणाचा मसुदा कागदावरून प्रत्यक्ष अंमलबजावणीत येईपर्यंत ग्रामीण तरुणांमधील अस्वस्थता पूर्णपणे संपणार नाही.




**गावगाड्याचे सामाजिक ताणेबाणे आणि ओबीसी-मराठा वाद**

महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे खरे वैभव हे ग्रामीण भागातील 'बारा बलुतेदार' आणि 'गावगाड्याच्या' सलोख्यावर टिकून आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत आरक्षणाच्या मुद्द्यावरून या सलोख्याला तडे गेल्याचे चित्र चिंताजनक आहे. मनोज जरांगे यांच्या मागण्या आणि त्याला उत्तर म्हणून ओबीसी नेत्यांनी घेतलेली आक्रमक भूमिका यांमुळे ग्रामीण भागात 'मराठा विरुद्ध ओबीसी' असा सुप्त संघर्ष पाहायला मिळत आहे.

शासनाने दिलेल्या मसुद्यानंतर सत्ताधाऱ्यांनी याला ऐतिहासिक यश म्हटले असले, तरी ओबीसी समाजघटकांमध्ये एक प्रकारची असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. आपल्या हक्काच्या आरक्षणात वाटेकरी निर्माण होणार नाही ना, या भीतीने ओबीसी समाज सावध झाला आहे. ग्रामीण भागातील बाजारात, चहाच्या टपरीवर, ग्रामपंचायतींच्या राजकारणात आता जातीचे रंग अधिक गडद होऊ लागले आहेत. शतकानुशतके एकमेकांच्या सुख-दुःखात धावून जाणारा शेजारी आज आरक्षणाच्या मुद्द्यावर समोरासमोर उभा ठाकताना दिसत आहे. हा बदलणारा सामाजिक पोत महाराष्ट्राच्या पुरोगामी प्रतिमेला छेद देणारा आहे. शासनाला आता केवळ मसुदा देऊन चालणार नाही, तर ओबीसी समाजाला विश्वासात घेऊन त्यांच्याही मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करावी लागेल, अन्यथा गावगाड्यातील हा विसंवाद भविष्यात सामाजिक अशांततेला कारणीभूत ठरू शकतो.

**शासकीय भूमिकेची कसोटी आणि राजकीय गणिते**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपसमितीचे अध्यक्ष विखे-पाटील यांनी मसुदा देऊन तूर्त सरकारसमोरील मोठे संकट टळले असले, तरी त्यांची खरी कसोटी आता सुरू होणार आहे. ही 'सावध माघार' आहे, म्हणजेच जरांगे-पाटील आणि मराठा समाजाची नजर सरकारच्या प्रत्येक हालचालीवर असणार आहे. ग्रामीण जनता आता आश्वासनांना भुलणारी राहिलेली नाही. प्रशासकीय पातळीवर मसुद्यातील अटींची पूर्तता करताना कायदेशीर आणि घटनात्मक पेच निर्माण होणार नाहीत, याची काळजी सरकारला घ्यावी लागेल.

दुसरीकडे, विरोधकांनी यावर घेतलेली संशयाची भूमिका ही आगामी निवडणुकांचे राजकारण डोळ्यासमोर ठेवूनच आहे. आरक्षणाचा हा चेंडू आता पूर्णपणे सरकारच्या कोर्टात आहे. जर शासनाने वेळेत आणि पारदर्शकपणे अंमलबजावणी केली, तर ग्रामीण भागात सत्ताधाऱ्यांबद्दल विश्वास वाढेल. मात्र, यात कायदेशीर त्रुटी राहिल्या किंवा वेळकाढूपणा झाला, तर हाच ग्रामीण महाराष्ट्र सत्ताधाऱ्यांविरुद्ध अधिक तीव्रतेने एल्गार पुकारेल, यात शंका नाही.

**पुढील वाटचाल: सलोखा आणि विकासाचे राजकारण हवे**

'राष्ट्र सह्याद्री'चा स्पष्ट दृष्टिकोन आहे की, आरक्षणाची लढाई ही केवळ एका जातीपुरती मर्यादित नाही, तर तो संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्राच्या अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. आरक्षणाचा मसुदा मिळणे हा विजयाचा पहिला टप्पा असू शकतो, पण ते अंतिम ध्येय नाही. शिक्षण संस्थांचे वाढते सुलभीकरण आणि सरकारी नोकऱ्यांची घटती संख्या यांमुळे आरक्षणाचे फायदे किती तळागाळातील तरुणांपर्यंत पोहोचतील, हाही एक संशोधनाचा विषय आहे.

त्यामुळे शासनाने आरक्षणाच्या अंमलबजावणीसोबतच ग्रामीण भागातील शेती उद्योगाला बळकटी देणे, स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती करणे आणि शिक्षण सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे यावर भर दिला पाहिजे. मनोज जरांगे-पाटील यांनी घेतलेली सावध भूमिका ही ग्रामीण जनतेच्या परिपक्वतेचे लक्षण आहे. आता शासनानेही तितक्याच परिपक्वतेने आणि प्रामाणिकपणे पावले टाकण्याची गरज आहे.

थोडक्यात सांगायचे तर, हा मसुदा म्हणजे केवळ तात्पुरती मलमपट्टी ठरू नये. महाराष्ट्राच्या समाजजीवनाला लागलेली सामाजिक संघर्षाची वाळवी रोखायची असेल, तर मराठा समाजाला न्याय देताना ओबीसी बांधवांवर अन्याय होणार नाही, असा सुवर्णमध्य सरकारला काढावाच लागेल. ग्रामीण महाराष्ट्राची शांतता, समृद्धी आणि ऐक्य टिकवून ठेवणे ही जितकी शासनाची जबाबदारी आहे, तितकीच ती सर्व समाजघटकांचीही आहे. जरांगे-पाटील यांच्या 'सावध माघारी'चा आदर करून शासनाने आता कृतीतून सिद्ध करण्याची वेळ आली आहे, कारण ग्रामीण महाराष्ट्र अत्यंत बारकाईने या सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून आहे..!

# अहिल्यादेवींच्या जन्मस्थळामुळे आपण खरे भाग्यवान : हभप देविदास महाराज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**चांदा :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मस्थळामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक खऱ्या अर्थाने भाग्यवान असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. देविदास महाराज आडभाई यांनी केले. चांदा येथील श्रीराम मंदिरात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची १०१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्योती मोहनराव राशिनकर व मोहनराव राशिनकर यांनी सपत्नीक अहिल्याबाईंच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनीही प्रतिमेस अभिवादन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना ह.भ.प. देविदास महाराज आडभाई म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आणि आदर्शवत आहे. त्यांचे जन्मगाव चोंडी हे अहिल्यानगर जिल्ह्यात असल्याने जिल्हावासीयांना त्याचा अभिमान वाटला पाहिजे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात चांदा गावच्या सरपंच सुनंदाताई दहातोंडे यांनी अहिल्याबाईंच्या जीवनकार्याची माहिती उपस्थितांना दिली. तर आसाराम कर्डिले यांनी समारोपपर भाषणात अहिल्याबाईंच्या लोककल्याणकारी कार्याचा गौरव केला.

याप्रसंगी माजी सरपंच सुनंदाताई दहातोंडे, आसाराम कर्डिले, मोहन राशिनकर, डॉ. सुधाकर निकाळजे, विष्णूपंत दहातोंडे, गोरक्षनाथ दिवटे, प्रकाश दातार, ज्ञानदेव भगत, राजेंद्र शेटे, सुभाष कर्डिले, पोलीस पाटील कैलास अभिनव, गणपत पुंड, बाबासाहेब राशिनकर, अशोक हराळे, रमेश डहाळे, चांगदेव पाचोरे, संजय दहातोंडे, अनिल बोंडगे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शामराव पवार यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



श्रीराम मंदिर या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त अनेक मान्यवर उपस्थित होते ( छाया, देविदास चौरे )

# मक्तापुर येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना जयंती निमित्त अभिवादन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापुर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मक्तापूर ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली

यावेळी मराठा सुकाणू समिती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.ज्येष्ठ नेते छबुराव बर्डे अध्यक्षस्थानी होते.यावेळी गणेश झगरे म्हणाले की राजमाता अहिल्यादेवी होळकर शूरवीर होत्या त्यांचे कार्य मोठे होते,त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन वाटचाल करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन केले.

यावेळी पोलीस पाटील सरपंच अनिल लहारे,सुरेश कोळेकर,अनिल साळवे, ग्रामसेवक दत्तात्रय गर्जे, अमोल खैरे,ग्रामपंचायत सदस्य अनिल गोरे,मोहन सातपुते, पोपटराव सातपुते, दीपक बर्डे, मनोज झगरे,गणेश कराडे, अमोल भागवत,तन्मय पांडागळे,सुनील साळवे जोईल साळवे,ज्ञानेश्वर बर्डे,माजी सरपंच हरिभाऊ कोळेकर, दत्तात्रय कोळेकर सर राजेंद्र कोळेकर सर निवृत्ती लहारे अशोक साळवे अगदी मक्तापूर ग्रामस्थ उपस्थित होते



# कृषीदूतांच्यावतीने चिंचबन येथे अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषी महाविद्यालय सोनई येथील ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव व औद्योगिक जोड प्रकल्प २०२६-२७ अंतर्गत चिंचबन (ता. नेवासा) येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन कृषीदूत विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेत त्यांच्या आदर्श विचारांचे महत्त्व उपस्थितांना सांगितले.

या कार्यक्रमात कृषीदूत सोमेश्वर कोतकर,विजय गर्धे,अथर्व गोडसे,शेखर गायकवाड,राहुल गंगावणे व धनराज बांदल यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमास चिंचबन येथील दत्तात्रय सपकाळ,विशाल बनकर, राजेश बनकर यांच्यासह ग्रामस्थांची विशेष उपस्थिती लाभली.

ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी कृषी महाविद्यालय,सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, प्रकल्प समन्वयक प्रा. अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष चौगुले, प्रा. नरेंद्र दहातोंडे आणि प्रा. दिशा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.ग्रामस्थांनी कृषीदूत विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजात महापुरुषांच्या विचारांचा प्रसार होऊन युवकांना प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.



# अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्तीचे प्रतीक : मच्छिंद्र खेमनर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी |** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राबवलेले सुशासन हे आजही प्रशासकीय व्यवस्थेसाठी एक वस्तुपाठ आहे. शेतकरी, व्यापारी आणि सामान्य प्रजेच्या कल्याणाला त्यांनी दिलेले सर्वोच्च प्राधान्य आणि स्त्री शिक्षणासह अध्यात्मिक क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने अहिल्यादेवी होळकर या स्त्री शक्तीचे प्रतीक होत्या असे प्रतिपादन राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष मच्छिंद्र खेमनर (जानकर) यांनी केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खेमनर (जानकर) बोलत होते. रामभाऊ भुसाळ, सरुनाथ उंबरकर, भागवत उंबरकर, भिकाभाऊ खेमनर, पत्रकार सुरेश थोरात, ॲड. रवी शेळके, लक्ष्मण जुंधारे, लहानू डोखे, गणेश भुसाळ, विलास उंबरकर, दीपक शेळके, अंबाजी माळी, सुरेश भुसाळ, संपत भुसाळ, प्रतिक शेळके, दीपक चौधरी, पोपट खेमनर, सुरेश बाम्हणे, राधाकृष्ण चोपडे, गोरख माळवदे, चांगदेव खेमनर, गणेश जुधारे, रामभाऊ खेमनर, ज्ञानदेव सारबंदे, हौशीराम खेमनर, भागा खेमनर, अण्णासाहेब खेमनर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ याप्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भिकाभाऊ खेमनर यांनी उंबरी बाळापूर येथे अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारावे, अशी भावना व्यक्त केली. तसेच रामभाऊ भुसाळ यांनी अहिल्यादेवीच्या कार्याला उजाळा दिला.

यावेळी पत्रकार सुरेश थोरात म्हणाले, की, गावा गावात गायरान जमिनी, शेततळे, बियाणे बॅंक, हुंडा बंदी, अन्नछत्रे, वाटसरूसाठी पाणपोई, धर्मशाळा यांची अहिल्यादेवी होळकर यांनी सुरूवात आणि उभारणी केली. देशभरात हजारो मंदिरे आणि घाट बांधण्याबरोबरचं शेतकऱ्यांसाठी मोठे काम केले. काशी, गया, सोमनाथ आणि उज्जैन यांसारख्या तीर्थक्षेत्रांचा जीर्णोध्दार करून अहिल्यादेवी यांनी भारताची सांस्कृतिक ओळख जपल्याचे सांगितले.

ॲड. रवी शेळके म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी काश्मीर ते कन्याकुमारी पर्यत नद्यावर हजारो घाट बांधले. बारा ज्योतिर्लिंगाचा जिर्णोध्दार केला. देशात हजारो विहिरी आणि बारवाची निर्मिती केली. विशेष म्हणजे माणसाप्रमाणे पशु पक्ष्यांना देखील पाणी पिता यावे यासाठी या बारवाची व विहिरींची संरक्षणा करण्यात आली. त्याच्या या कार्यामुळे लोक त्यांना पुण्यश्लोक म्हणू लागले. या कार्यक्रमांचे सुत्रसंचलन आणि आभार लक्ष्मण जुंधारे यांनी केले.

दरम्यान, अहिल्यादेवींच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आश्वी बुद्रुक येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. तसेच आश्वी खुर्द, पिंप्री-लौकी अजमपूर, निमगावजाळी, दाढ खुर्द, शिबलापूर, शेडगाव, डिग्रस, मालुंजे, पानोडी, ओझर बुद्रुक, ओझर खुर्द, खांबे, वरंवडी यांसह पंचक्रोशीतील गावागावांत देखील जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वत्र त्यांना अभिवादन करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.

# खरीप हंगामपूर्व बैठक व संतुलित खत वापर अभियान संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामपंचायत टाकळीभान येथे कृषि महाविद्यालय, भानसहिवरे, महाराष्ट्र शासन कृषी विभाग व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगाम पूर्व



बैठक व संतुलित खत वापर अभियान - २०२६ हा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.याप्रसंगी राष्ट्रवादी किसान सभेचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, शिवाजीराव धुमाळ, प्रा. जयकर मगर, अनिल कोकणे, भाऊसाहेब पटारे, दिगंबर मगर, राजेंद्र देवळालकर, बाळासाहेब खुरुद, संजय पटारे, अण्णासाहेब दाभाडे, सदाशिव रणनवरे आदी उपस्थित होते. मंडळ कृषी अधिकारी पौर्णिमा गाडे यांनी टाकळीभान कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. सुभाष घोडके, किशोर अचपळे, अवधूत मेहेत्रे यांनी शेतीशी निगडीत विविध विषयांवर शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली. सहाय्यक कृषी अधिकारी आदिनाथ धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले.

# पालक : जीवनाचे पहिले विद्यापीठ

दरवर्षी १ जून हा दिवस जगभरात 'जागतिक पालक दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता दिली. पालकांनी आपल्या मुलांच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी आणि उज्वल भविष्यासाठी केलेल्या निःस्वार्थ त्यागाचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

मानवी जीवनाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मुलांचे पहिले शिक्षक, मार्गदर्शक आणि आदर्श म्हणजे पालक. बालकाचे पहिले शिक्षण घरातूनच सुरू होते. बोलणे, चालणे, विचार करणे, वागणे आणि समाजाशी जुळवून घेणे हे सर्व गुण मुलांना पालकांकडून मिळतात. त्यामुळे घर ही मुलांची पहिली शाळा आणि पालक हे त्यांचे पहिले गुरु मानले जातात.

भारतीय संस्कृतीत पालकांना देवतुल्य स्थान आहे. आई आपल्या मायेने, वात्सल्याने आणि त्यागाने मुलांचे संगोपन करते, तर वडील कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आयुष्यभर परिश्रम घेतात. त्यांच्या प्रेम, समर्पण आणि कष्टांमुळेच मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात पालकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. इंटरनेट, स्मार्टफोन आणि सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे मुलांसमोर अनेक संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. मुलांना तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकविणे, चुकीच्या माहितीपासून दूर ठेवणे आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूक करणे आवश्यक झाले आहे.

मुलांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही पालकांची भूमिका महत्त्वाची आहे. वाढती स्पर्धा, शैक्षणिक ताण आणि सामाजिक दबावामुळे अनेक मुले मानसिक तणावाचा सामना करतात. अशा वेळी पालकांनी मुलांचे मित्र बनून त्यांना भावनिक आधार देणे गरजेचे आहे. संवाद, प्रेम आणि विश्वास यांवर आधारित नाते मुलांच्या आत्मविश्वासाला बळकटी देते.

शिक्षण प्रक्रियेत पालकांचा सक्रिय सहभाग मुलांच्या यशासाठी महत्त्वाचा ठरतो. मुलांच्या आवडी-निवडी समजून घेणे, त्यांना योग्य प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या क्षमतांचा आदर करणे आवश्यक आहे. तसेच मुलगा-मुलगी भेदभाव न करता समान संधी देणे ही काळाची गरज आहे.

जागतिक पालक दिन हा केवळ उत्सव नसून कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. पालकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांना प्रेम, आदर आणि वेळ देणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता ठरेल. सुदृढ कुटुंब, सुसंस्कृत समाज आणि समृद्ध राष्ट्रनिर्मितीसाठी पालकांचे योगदान अनमोल आहे. म्हणूनच पालक हे खऱ्या अर्थाने जीवनाचे पहिले विद्यापीठ आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत.ही आवृत्ती वर्तमानपत्रातील ''दिनविशेष लेख'' किंवा ''विशेष सदर'' यासाठी योग्य अशा सुमारे ४५० शब्दांत संक्षिप्त करण्यात आली आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे,
समाजशास्त्राचे अभ्यासक
ईमेल – bagate.
Aajenda5gmail.com

# श्रीरामपूर भाजपाच्यावतीने राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहर प्रतिनिधी येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१वी जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व आरती करून उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड,भाजपा नेते संजय फंड,नगरसेवक आशिष धनवटे, संजय गांगड,रवी पाटील,श्रीनिवास बिहाणी,संजय छल्लारे,दीपक चव्हाण, मारुती बिंगले,विठ्ठलराव राऊत, रवी गुलाटी,राजेश अलघ,केतन खोरे, विशाल अंभोरे,विजय आखाडे ,बंडुकुमार शिंदे,असिफभाई पोपटीया, रुपेश हरकल,मिलिंदकुमार साळवे, साजिदभाई शेख,सुबोध शेवतेकर, अमोल शेटे,शंकरभाऊ चव्हाण, योगेश ओझा, श्रेयश सुवर्ण पाठकी,पंकज ललवणी, आनंद बुधेकर,महेश सुळ, श्रेयस झिरंगे,किरण रकटे,राहुल सराफ, बाळासाहेब हरदास,प्रशांत शितोळे, राजु धामोणे, किशोर बिंगले, जसपालसिह सहानी,प्रतीक वैद्य, रवी पंडित,अमोल बोंबले, विजय देवकाते, स्वातीताई चव्हाण,पुजाताई चव्हाण, पुष्पलता हारदास, कविताताई दुबे, अनिताताई शर्मा,आदी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# महिला सक्षमीकरण योजनांच्या मागे अहिल्यादेवींची प्रेरणा : ना. राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महीलांच्या सक्षमीकरणा करीता केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केलेल्या योजना मागे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची प्रेरणा असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती दिनाच्या निमिताने मंत्री विखे पाटील यांनी पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या मुख्य कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर शहराचे अध्यक्ष अनिल मोहिते याप्रसंगी उपस्थित होते. धर्म रक्षणाबरोबरच जनकल्याण आणि स्त्री सन्मानाला अहील्यादेवी होळकर यांचे प्राधान्य होते.महीला अर्थिक दृष्ट्या



सक्षम झाल्या पाहीजेत या उद्देशाने महेश्वर येथे कुशल विणकरांच्या माध्यमातून हातमाग व्यवसायाला पाठबळ दिले.

ही केवळ वस्त्रनिर्मीती नव्हती तर महीलांचा स्वाभीमान रोजगार आणि आत्मनिर्भरतेची सुरूवात होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात योजनांच्या माध्यमातून सुरू झालेल्या महीलांच्या सक्षमीकरणाच्या कार्यामागे अहील्यादेवीच्या विचारांची प्रेरणा असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकराने महीलांकरीता मोठ्या प्रमाणात योजना सुरू केल्या.

अहील्यानगर जिल्ह्यात शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.परंतू त्यापुढे जावून एकल महिलांना पाठबळ देण्यासाठी सुरू झालेल्या योजनेमुळे एकल महीलांना कौशल्या प्रशिक्षणाच्या संधी मिळाल्या आहेत.अनेक महीलांचे प्रशिक्षण पूर्ण होवून त्यांना रोजगार निर्माण झाला. आशा पध्दतीची योजना सुरू करणारा अहील्यानगर जिल्हा एकमेव असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. तिर्थक्षेत्रांच्या विकासाचा एक आदर्श अहील्यादेवीनी आपल्या कारकिर्दीत निर्माण केला.

मंदीराचा जिर्णोध्दार घाटांचा विकास विहीरीची निर्मिती ही देशाच्या सांस्कृतिक परंपरेची प्रतिक असून जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापनाचे उतम उदाहरण ठरले आहे.यातुन देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेला बळकटी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तिनशेव्या जयंतीच्या निमिताने जलसंपदा विभागाच्या वतीने अहील्यादेवीच्या विचारांची प्रेरणा घेवून काढण्यात आलेली गोदा ते नर्मदा जलयात्रा धर्म संस्कृती आणि पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी होती.यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश मधील सांस्कृतिक परंपरेचा वारसा अधिक घट्ट झाला आहे.

द•ख•ल

## भैरवनाथनगर येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात



**श्रीरामपूर** : तालुक्यातील भैरवनाथनगर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच दिपालीताई फरगडे, श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगर सेविका प्रणितीताई चव्हाण यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले, प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. याप्रसंगी मा. नगरसेवक दीपक चव्हाण, खादी ग्रामोद्योगचे संचालक प्रविण फरगडे, ग्रामपंचायत सदस्य कांता शेळके, राहुल लिहिणार, पांडुरंग लबडे, आरोग्य अधिकारी सुभाष शेळके, महेश बोर्डे, प्रमिला सुलाखे, दिपाली फरगडे, यास्मिन शेख, बापु गाढे, श्रीराम फरगडे, बबन लिहिणार आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात

**श्रीरामपूर** : येथील यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन साहेबराव रकटे होते. यावेळी व्हाईस चेअरमन माजी प्राचार्य टी. ई. शेळके, प्रा. बाबुराव उपाध्ये, प्रा. शिवाजीराव बारगळ, मेजर कृष्ण सरदार, माजी मुख्याध्यापक लक्ष्मणराव निकम, रामदास कवितके, एस. के. संकपाळ, रामचंद्र सुगर , सुभाष पानसरे अ‍ॅडव्होकेट, पी आर जगधने अ‍ॅड. उदय रोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वक्त्यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या लोकाभिमुख प्रशासनाची, सामाजिक बांधिलकीची व धर्मनिरपेक्ष विकासदृष्टीची माहिती दिली. समाजकल्याण, न्यायव्यवस्था, पायाभूत सुविधा आणि धार्मिक स्थळांच्या जतनासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख करण्यात आला.

## नेत्र चिकित्सा शिबिरात १०५ जणांची तपासणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : राज्याचे माजी जलसंधारण मंत्री श्री शंकरराव गडाख पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन पुणे येथील सुप्रसिद्ध बुधराणी हॉस्पीटल व ना.शंकररावजी गडाख मित्र मडंळ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच बाभुळखेडे ग्रामपंचायत व सोसायटी यांच्या सहकार्याने आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरात १०५ जणांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. सदरच्या नेत्र चिकित्सा शिबिरात मोतीबिंदू,काचबिंदू, टेरीजियम,लासुर, लॅसिक आदी वेगवेगळ्या प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या.



शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांची मोतीबिदुं शस्त्रक्रिया पुणे येथे बुधराणी हॉस्पीटलमध्ये मोफत करण्यात येणार आहे.यावेळी बुधराणी हॉस्पीटलच्या कॉर्डीनेटर मनिषा कोरडे व मीरा पटारे यांनी उपस्थित रुग्णांची नेत्र तपासणी केली. यावेळी झालेल्या शिबीर प्रसंगी सरपंच ज्ञानेश्वर औताडे, हरीभाऊ विधाटे, केशवराव विधाटे, रामभाऊ विधाटे, रामेश्वर विधाटे, आबासाहेब मते, व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर विधाटे, नवनाथ नवले, अशोक विधाटे, राजेद्रं हुसळे,इंजिनिअर महेश औताडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिर यशस्वी होण्यासाठी ना. शंकरराव गडाख मित्र मडंळाचे अध्यक्ष महेश औताडे यांनी विशेष नियोजन केले.

शिबीर आयोजक सरपंच ज्ञानेश्वर औताडे यांनी सर्वांचे आभार मानले.

## ट्रॅक्टर विक्रीच्या व्यवहारात फसवणूक करणाऱ्यास अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : ट्रॅक्टर विक्रीच्या आमिषाने लाखो रुपयांची फसवणूक प्रकरणातील एका संशयिताला राहुरी पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून तब्बल ३६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या घटने संदर्भात राहुरी पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार राहुरी तालुक्यातील पिंप्री अवघड येथील जावेद जाकीर शेख आणि धामोरी येथील नितीन भाऊसाहेब कदम यांनी दिलेल्या तक्रारीत काही व्यक्तींनी ट्रॅक्टर विक्रीचे आश्वासन देत त्यांच्याकडून रोख रक्कम व धनादेशाद्वारे प्रत्येकी सहा लाख रुपये स्वीकारल्याचा आरोप फिर्यादी मध्ये करण्यात आला आहे.

मात्र, त्यानंतर ट्रॅक्टर न देता फसवणूक करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी राहूरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून संबंधित संशयित फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलिसअधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या पथकाने २७ मे रोजी सोनई परिसरातील लांडेवाडी येथे सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला राहुरी पोलिस ठाण्यात आणून अटक करण्यात आली. यावेळी संशयिताच्या ताब्यातून जॉन डिअर कंपनीचे प्रत्येकी सुमारे १८ लाख रुपये किमतीचे दोन ट्रॅक्टर आणि त्यांना जोडलेली कृषी अवजारे, असा एकूण सुमारे ३६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या घटने संदर्भातील ट्रॅक्टर विक्रीचे आश्वासन देऊन कोणाची फसवणूक झाल्याचा संशय असल्यास संबंधितांनी तातडीने राहुरी पोलिसांशी संपर्क साधावा. तसेच अशा प्रकारच्या आमिषांना बळी पडू नये, व्यवहार करताना आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करावी, असे आवाहन पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले आहे. सदरील कारवाई पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल अर्जुन दारकुंडे, पोलिस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे आणि भाऊसाहेब शिरसाठ यांच्या पथकाने केली आहे.

## जगदगुरू तुकोबाराय निजधाम संस्थेच्यावतीने ज्ञानेश्वर देवस्थानला पाच लाखाचा निधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : पंढरपूर येथील श्री जगदगुरू तुकोबाराय निजधाम संस्था या सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेचे मार्गदर्शक आळंदी येथील वाणीभूषण महंत श्री ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली) यांच्या पुढाकाराने पाच लाखाची देणगी नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानला धनादेशाद्वारे सुपूर्त करण्यात आली. श्री क्षेत्र पंढरपूर येथे ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली) आळंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहामध्ये उरलेली सुमारे ७५ लाख रुपयांची रक्कम गुरुवर्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली) यांनी वेगवेगळ्या देवस्थानांना देणगीच्या माध्यमातून देण्याचा निर्णय घेतला होता.



पंढरपूर देवस्थान,आळंदी माऊली संस्थान, आळंदीतील वारकरी शिक्षण संस्था, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान श्रीक्षेत्र नेवासा या देवस्थानच्या यात समावेश होता. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानमध्ये झालेल्या धनादेश प्रदान कार्यक्रम प्रसंगी संतभूमी उपासना पारायण सोहळयाचे अध्यक्ष दत्तात्रय सोनवणे व विश्वस्त विष्णूपंत ठोसर यांच्या हस्ते वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्याकडे पाच लाखांचा धनादेश सुपूर्त करण्यात आला.

त्यांनी ज्ञानेश्वर माऊली कदम यांच्या संकल्पननचे कौतुक करत त्यांना धन्यवाद दिले. यावेळी रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव,सचिन महाराज पवार,गणेश महाराज आरगडे,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त रामभाऊ जगताप, ज्ञानेश्वर माऊली शिंदे,कैलास जाधव, संतसेवक बदाम महाराज पठाडे,ह.भ.प. राम महाराज खरवंडीकर,सोनू महाराज पांगरे,श्रीधर महाराज अनुभुले, देवराम सोनवणे,आप्पासाहेब माकोणे,शिवाजी आप्पा होन,संतसेवक दामोदर पवार उपस्थित होते.

## हनुमंतगावात अहिल्यादेवी जयंतीचा प्रेरणादायी सोहळा

### आजी–माजी लोकप्रतिनिधींचा गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता आणि जनसेवेचा आदर्श निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती हनुमंतगाव येथे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. ग्रामस्थ, महिला, युवक, आजी–माजी लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या लोकहितवादी कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रमुख वक्ते इंजि. निलेश वडितके यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा सखोल आढावा घेताना त्यांच्या सुशासन, न्यायनिष्ठा आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या धोरणांचा उल्लेख केला.



समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात ग्रामविकासासाठी योगदान देणाऱ्या आजी–माजी सरपंच व उपसरपंचांचा गौरव करण्यात आला. मनीषा माळी, प्राजक्ता अनाप, उज्वला तुंबारे, भास्कर फणसे, नानासाहेब घोलप, गोरक्षनाथ ब्राम्हणे तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोक घोलप यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ समाजसेवक तथा दैनिक सार्वमत कृषी आयकॉन पुरस्काराचे मानकरी ड. किसन कोतकर यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी दिवंगत माजी सरपंच कै. विजय ब्राम्हणे आणि कै. लक्ष्मण कानडे यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित सुवासिनींचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात संचालक अशोक घोलप, उपसरपंच सौ. प्राजक्ता संजय अनाप, सौ. राजश्री बुचुडे आणि निवृत्त शिक्षक पोपटराव पवार यांनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान, इयत्ता पहिलीत शिक्षण घेणारी कुमारी त्रिषा विकास फणसे हिने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर केलेल्या प्रभावी भाषणाने उपस्थितांची मने जिंकली.

तिच्या ओघवत्या वक्तृत्वाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश रोडे यांनी केले, तर सचिन बुचुडे यांनी आभार मानले. उत्सव समितीच्या वतीने उपस्थितांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते. उत्सव समिती व समस्त हनुमंतगाव ग्रामस्थांच्या सहकार्याने संपन्न झालेला हा सोहळा सामाजिक एकात्मता, प्रेरणा आणि सांस्कृतिक अभिमानाचे दर्शन घडवून गेला.

# चाळीस वर्षांच्या सत्तेतही तालुक्याचा विकास नाही

## महायुतीचे बाळासाहेब दिघे व राजेंद्र सोनवणे यांची थोरातांवर टीका

संगमनेरचे पाणी पळविल्याचा आरोप करणाऱ्यांनी २००५ साली समन्यायी पाणी वाटप कायद्याचे ओझे संगमनेर करांवर तुम्हीच लादले होते. गणेश विसर्जनासाठीही पाणी उपलब्ध होत नव्हते, अशी परिस्थिती होती. मात्र गेल्या दोन वर्षांत भर उन्हाळ्यात निळवंडे डावा व उजवा कालवा तसेच प्रवरा नदीत शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी पाणी सोडण्यात आले. बंधारे, पाझर तलाव भरले जात असून ज्या गावांचा सिंचन योजनांमध्ये समावेश नाही, त्या गावांनाही पाणी देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

पूर्वी पाणीच उपलब्ध नसल्याने विजेच्या मागणीचा प्रश्न निर्माण होत नव्हता. मात्र आता शेतीसाठी पाणी उपलब्ध होत असल्याने वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी धांदरफळ साकूर जवळे, कडलग, हिवरगाव पावसा या वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजनेअंतर्गत कऱ्हे–तळेगाव येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू असून शेतकऱ्यांना हक्काची वीज उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

पूर्वी तुमच्या कार्यकाळात वीज रोहित्र बदलण्यासाठी तुमचे पी ए शेतकऱ्यांकडून वर्गणी गोळा करत होते. मात्र आमदार खताळ यांच्या कार्यकाळात कोणाकडूनही एक रुपया न घेता दुसऱ्याच दिवशी रोहित्र उपलब्ध करून देण्याचे काम होत आहे.

भोजापूर चारीच्या कामात कोणत्या ठेकेदारांनी किती वेळा काम सुरू करून किती खोटी बिले काढली याची माहिती या पंचक्रोशीतील लोकांकडे असल्याचा गंभीर आरोप ही घोरपडे व दिघे यांनी केला.

तळेगावचा भाग तुम्ही ९० टक्के पाण्यापासून कायम वंचित ठेवला त्यामुळे ऊस लावायचा कोठे हा प्रश्न आम्हा तळेगावकरांसमोर पडला आहे त्यामुळे तुम्हाला तळेगावला ऊस परिषद घेऊन नेमके काय साधायचे आहे असा सवाल उपस्थित करत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पा यांनी भोजापुरचारी जलसंधारणकडे होती ती जलसंपदाकडे वर्ग केली आहे गेली ४० वर्षात तिगाव माथ्या पर्यंत आलेच नाही ते पाणी जल संपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ पाटील यांनी टेस्टिंगच्या माध्यमातून की होईना ती गाव माथ्यापर्यंत पाणी आणून दाखवले व थोड्या दिवसात भोजपुर चारीचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब दिघे यांनी सांगितले

### वैफल्यातून आमदार अमोल खताळांवर टीका....

आमदार अमोल खताळ यांना जनतेने विकासासाठी निवडून दिले आहे. रोजगार,आरोग्य, शिक्षण, शेती आणि पाणी यांसारखे सर्वसामान्यांचे जीवनाशी निगडित प्रश्न सोडविण्या साठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यामुळे वैफल्यातून होणारी टीका थांबवून त्यांना विकासकामे करून घ्या, अन्यथा जनता योग्य वेळी उत्तर देईल, असा इशारा शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे आणि जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब दिघे यांनी देत आमदार अमोल खताळ शांतपणे काम करत आहेत. ते काय काम करतात हे जनता पाहत आहे. त्यामुळे वैफल्यातून त्यांच्यावर होणारी टीका आता कुठेतरी थांबली पाहिजे, असा उपरोधिक टोला शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे यांनी लगावला.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : माजी आमदार बाळासाहेब थोरात यांना गेल्या चाळीस वर्षांच्या कार्यकाळात अनेक प्रश्न सोडविता आले नाहीत. मात्र आमदार अमोल खताळ यांनी अवघ्या दीड वर्षांच्या कालावधीत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू केले आहेत.

तालुक्यात विकास कामांना गती मिळत असताना ते काही जणांना पाहवत नसल्याने ये नैराश्यातून आमदार खताळ यांच्यावर टीका करत असल्याचा आरोप जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब दिघे आणि शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे यांनी केला.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, ऊस विकास परिषदेच्या माध्यमातून गावोगावी जाऊन राजकीय आखाडे मांडण्याचा प्रयत्न होत आहे.





मात्र जनतेने लोकशाही मार्गाने तुमचा पराभव केला आहे त्या पराभवाचे तुम्ही आत्मचिंतन करण्याऐवजी आमदार खताळ यांच्यावर टीका करण्याचे काम सुरू केले आहे. भोजापूर चारीच्या दुरुस्तीसाठी जलसंपदा विभागाकडून ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून चारीच्या रुंदीकरणाचे काम लवकरच सुरू होणार आहे.

तुमच्या कार्यकाळामध्ये या भागात पाणी पोहोचविण्यासाठी कुठलेच ठोस प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे अनेक गावे पाण्यापासून वंचित राहिली. मात्र महायुती सरकारच्या माध्यमातून जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून दमणगंगा–गोदावरी–वैतरणा या नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून तालुक्यात पाणी आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त माळवाडगाव सोसायटीत गुणवंतांचा गौरव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या वतीने लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

यानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थी व युवकांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमात माळवाडगावच्या पल्लवी आसने व पायल पवार यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल, तसेच अमोल दांगट यांची मुंबई महानगरपालिकेत नियुक्ती झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. याचबरोबर दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या अनुष्का आसने, आदित्य आसने आणि पायल दळे या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम माळवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन गिरीधर आसने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब आसने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास सोसायटीचे संचालक सुरेश चिडे, अमोल मोरे, बाबासाहेब आसने, किसनराव आसने, दिलीपराव हुरुळे, माजी पोलीस पाटील श्रीधर आसने, उत्तमराव आसने, रावसाहेब काळे, जालिंदर आबा आसने, लोकसेवा मंडळाचे बबनराव आसने, बाळासाहेब रायभान आसने, दादासाहेब चौधरी, सोसायटीचे सचिव प्रदीप आसने, युवा नेते योगेश आसने, ग्रामपंचायत सदस्य प्रसाद जगरूपे, रामकृष्ण आसने, बाबासाहेब शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, संस्थेचे संचालक व सभासद मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर युवा प्रतिष्ठाणच्या लोकोपयोगी उपक्रमातून अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** येथील लोकमाता अहिल्यादेवी होळकर युवा प्रतिष्ठाणच्या वतीने रविवार (ता.३१) रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम आयोजित करून अहिल्यादेवी होळकर यांना शहरातील सर्व समुदायातील नागरिकांनी एकत्र येत अभिवादन केले.प्रथम सकाळी दहा वाजता अहिल्यादेवी होळकर स्मारक येथे तालुक्याचे आमदार प्रा.रमेश बोरनारे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, उपाध्यक्ष रियाज शेख, अकिल




राजमाता होळकर जयंती निमित्त अभिवादन करताना आ. बोरनारे, डॉ. परदेशी, उपाध्यक्ष रियाज शेख, पारस घाटे, श्रीराम गायकवाड, शैलेश चव्हाण व इतर

शेख यांनीही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच रक्तदान शिबिराचे उदघाटन ही केले. या मान्यवरांनी रक्तदात्याना प्रमाण पत्र वितरित केली.या प्रसंगी अकिल शेख,संजय निकम,पारस घाटे,श्रीराम गायकवाड,पंकज ठोंबरे, राजेश गायकवाड,आमिरअली, हमीद कुरेशी,लिमेश वाणी, देविदास वाणी, गोकुळ भुजबळ,सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, प्रशांत त्रिभुवन, सचिन जोशी,शैलेश पोंदे,गिरीश चापानेरकर,अशोक पवार,सचिन राजपूत, दीपक साळुंके,

कल्याण काळे, प्रदीप साळुंके, ज्ञानेश्वर सिरसाट, सोपान पगार,चांगदेव उघडे यांची उपस्थिती होती. सूत्र संचलन व आभार धोंडीरामसिंह ठाकूर यांनी मानले. लोकमाता युवा प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित अहिल्यादेवी होळकरांच्या ३०१ व्या जयंती निमीत्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा मिरवणूक,मर्दानी खेळ,व पारंपरिक सांस्कृतिक वाद्य, व रक्तदान शिबिर अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून राजमाता अहिल्यादेवीं होळकर याना अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रम लोकमाता युवा प्रतिष्ठान ने आयोजित केले होते.

## पान १ वरुन

### लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिला अपात्र?

निवडणुका संपताच लाडक्या बहिणींची आठवण विसरणारे आणि स्वतःला दादा, भाऊ, भाई म्हणवणारे नेते आता कुठे गेले आहेत? असा संतप्त सवाल अंधारे यांनी उपस्थित केला. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही याविरोधात टीका केली. लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिलांना अपात्र ठरविण्यात आले. निवडणुकीच्या काळात कसलीही खातरजमा न करता घाईघाईने या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आणि आता साधारणपणे वर्ष-दीड वर्षाने सरकारला या योजनेत ८० लाख महिला अपात्र असल्याचासाक्षात्कार व्हावा ही मोठी अजब बाब आहे. हे या सरकारचे राजकीय, प्रशासकीय आणि अंमलबजावणीतील सामूहिक दारुण अपयश आहे, असं म्हणत सुप्रिया सुळेंनी सरकारवर निशाणा साधला. जनतेच्या कष्टातून निर्माण झालेला कर रुपी पैशांतून ही योजना चालविली जाते. थोडक्यात जनतेचा पैसा गेली वर्ष दीड वर्ष हे सरकार अपात्र लाभार्थ्यांना वाटत होते का असा प्रश्न उपस्थित होतो. ही संपूर्ण बाब मूळात या सरकारचे घोर अपयश उघड करणारी आहे. हे दिलेला शब्द पाळणारे सरकार नाही. केवळ निवडणुकीतील फायदा गृहित धरून त्यांनी महिलांना खोटे आमिष दाखविण्याचा उद्योग केला असे यावरुन स्पष्ट होते. तब्बल ऐंशी ऐं लाख महिलांना अपात्र घोषित करून या सरकारने राज्यातील महिलांचा विश्वासघात केला आहे, असं म्हणत त्यांनी सरकारवर शाब्दिक चपराक लगावली आहे.

### दोन दिवसात सातारा गॅझेट काढणार

आदेश काढायचे सरकारने तयारी दाखवल्याने उपोषण स्थगित केलं आहे, अशी घोषणा मनोज जरांगेंनी केली. तसेच सातारा गॅझेटीयर साठी सरकारला एक महिना वेळ द्यायला हरकत नाही. पण तोपर्यंत कुणबी प्रमाणपत्र काढण्यात येतील, अशी माहितीही मनोज जरांगेंनी दिली. आता जर थांबले तर आम्ही या दोघांना (राधाकृष्णा विखे पाटील- प्रसाद लाड) जबाबदार धरणार, असा इशाराही मनोज जरांगेंनी यावेळी दिला.५८ लाख नोंदींचे दस्तावेज जरांगेंना दिले जाणार. नोंदी सापडलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रे देणार, जात पडताळणीसाठी विभागीय आयुक्त १५ दिवसांत बैठक घेणार, सातारा गॅझेटसाठी सरकारला आणखी एक महिना वेळ, न्या.शिंदे समितीला एक वर्षांची मुदतवाढ, प्रमाणपत्र वैधतेसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन, आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष विखे-पाटलांचीही स्वतंत्र हेल्पलाईन, मंत्रालयात मराठा आरक्षण कक्ष स्थापन होणार असल्याचे विखे पाटील यांनी आंदोलन स्थळी जाऊन स्पष्ट केले.

### भावगीतांची सुरसम्राज्ञी सुमन कल्याणपूर यांचे निधन

यांचा जन्म २८ जानेवारी १९३७ रोजी बांगलादेशातील (तत्कालीन अविभाजित भारत) भवानीपूर येथे झाला होता. लहानपणापासूनच त्यांना संगीताची प्रचंड आवड होती. त्यांनी संगीताचा अतिशय कसून आणि सखोल अभ्यास केला होता. सुमनजींचे माहेरचे आडनाव 'हेमाडी' असे होते. त्यामुळे लग्नापूर्वी त्या सिनेसृष्टीत 'सुमन हेमाडी' या नावानेच गाणी गात असत आणि याच नावाने त्यांची सुरुवातीची गाणी लोकप्रिय झाली. सुमन कल्याणपूर यांचा सिनेसृष्टीतील प्रवेश अत्यंत रंजक होता. त्यांच्या संगीताच्या प्रवासाची सुरुवात गझलसम्राट तलत महमूद यांच्यामुळे झाली होती. एका जाहीर कार्यक्रमात गाणं गात असताना तलत महमूद यांनी सुमनताईंचा दैवी आवाज ऐकला. त्या आवाजाने प्रभावित होऊन तलत महमूद यांनी स्वतःच्या एका आगामी चित्रपटासाठी सुमनताईंना गाण्याची विचारणा केली. सुमनताईंनीही या सुवर्णसंधीला होकार दिला आणि तिथूनच त्यांचा चित्रपटसृष्टीतील यशस्वी प्रवास सुरू झाला. तर मराठी भावगीत गायनाची त्यांची सुरुवात ग. दि. माडगुळकर यांच्या अजरामर गीतांनी झाली.

### शिर्डी-नाशिक महामार्गावर मृत्यूचा थरार

धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की कारचा पुढील भाग अक्षरशः चेंदामेंदा झाला. तर बस सुमारे शंभर फूट अंतरावर रस्त्याखाली जाऊन बंद अवस्थेतील रसवंती मशीन उद्ध्वस्त करत थांबली. अपघातानंतर काही क्षण परिसरात भयावह शांतता पसरली. त्यानंतर बसमधील प्रवाशांच्या किंकाळ्यांनी संपूर्ण परिसर हादरून गेला. जीव वाचवण्यासाठी प्रवासी धडपडत होते. एका महिला प्रवाशाला धडकेच्या जोरामुळे बसबाहेर फेकले गेले. रक्तबंबाळ अवस्थेतील जखमींना पाहून घटनास्थळी उपस्थित नागरिकांच्याही काळजाचा थरकाप उडाला.अपघातात गंभीर जखमी झालेल्या विशाल आणि महेश कांबळे यांना तातडीने शिर्डीच्या साईबाबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले. काही क्षणांपूर्वी एकमेकांच्या सोबतीने प्रवास करणाऱ्या दोन भावांचा असा एकाचवेळी मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विशाल कांबळे हे निघोज येथील नायरा पेट्रोल पंपावर व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. कुटुंबाचा आधार असलेल्या या दोघांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघातात कांबळे यांची बहीण प्रियांका ससाणे, व त्यांची दोन्ही मुले प्रांजल ससाणे, सोहम ससाणे, यांच्यासह बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असून पायांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे. नागम्मा, कविता, ललिता, लक्ष्मी, अतर्क्य, ललिता गुंभनवार, श्रद्धा निते यांच्यावर सध्या साईबाबा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश येसेकर आणि पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद इंगळे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलविण्यात आले.दोन सख्ख्या भावांच्या मृत्यूची बातमी गावात पोहोचताच निंभेरे गावात शोककळा पसरली. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. कांबळे कुटुंबाच्या घरासमोर नातेवाईक आणि गावकऱ्यांची गर्दी उसळली होती. सकाळी घरातून हसत-खेळत बाहेर पडलेली मुलं संध्याकाळी कायमची निघून जातील, असे कुणालाही वाटले नव्हते, अशी हळहळ गावकरी व्यक्त करत होते. दोन भावांचे हरपलेले आयुष्य, उद्ध्वस्त झालेले कुटुंब आणि जखमींच्या वेदना यामुळे हा अपघात केवळ एक घटना न राहता अनेक कुटुंबांच्या आयुष्यावर कायमचा ओरखडा उमटवून गेला आहे.राहुरी मतदारसंघाचे आमदार अक्षय कर्डिले यांनीही तातडीने कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. मृत्यूचा महामार्ग? शिर्डी-नाशिक महामार्गावर वारंवार होणारे अपघात चिंतेचा विषय बनले आहेत. भरधाव वेग, निष्काळजी वाहनचालक आणि वाढती वाहतूक यामुळे हा मार्ग अनेकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहे. रविवारी झालेल्या या भीषण अपघाताने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

### माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची उमेदवारी जाहीर

परिषदेच्या या निवडणुकीकडे गांभीर्याने लक्ष दिलेले दिसून येत आहे. आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळोवेळी प्राजक्त तनपुरे यांना दिलेले शब्द महायुतीच्या वतीने खरे करून दाखविले जाणार आहे. या सर्व घडामोडींवर मुख्यमंत्र्यांची सूक्ष्म नजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांचाविजय निश्चित मानला जात आहे. काँग्रेसकडून निवडणुकीची औपचारिकता? - आज सोमवारी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत आहे. काँग्रेसचे श्रीरामपूर येथील नगराध्यक्ष करण जयंत ससाणे यांनी उमेदवारी अर्ज भरलेला असताना काँग्रेस पक्षाने रविवारी सायंकाळी झालेल्या बैठकीत अहिल्यानगर येथील दीप चव्हाण यांना उमेदवारी देण्याचे निश्चित केले. जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी याबाबत माहिती दिली. सर्वप्रथम अर्ज भरलेला असताना करण ससाणे यांनी उमेदवारी मागे का घेतली? काँग्रेस ह्या निवडणुकीकडे केवळ औपचारिकता म्हणून पाहते आहे का? अशी चर्चा आता जिल्ह्यात रंगली आहे.

## खंडाळ्यात शेतकरी मार्गदर्शन शिबीर उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**खंडाळा :** खरीप हंगामातील आपत्ती व्यवस्थापन तसेच यशस्वी उत्पादन क्षमतेबाबत शेतकऱ्यांनी सतर्कता बाळगावी याबाबत आयोजित कार्यशाळेत कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आत्मा जिल्हा अंतर्गत पिक प्रशिक्षण कार्यक्रमात संतुलित खताचा वापर व ई एल ''निनो'' अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना या कार्यक्रमाचे आयोजन श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथे पार पडले.

देशमुख म्हणाले की, कमी खर्चामध्ये अधिक उत्पादनाच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी कमी दिवसाच्या कालावधीत उत्पादन देणारे वाण निवडून बियाण्याची उगवण क्षमता तपासून घरचे बियाणे वापरावे,

बियाण्याची उगवण क्षमता ७० टक्के पाहिजे. तपासणी केल्याशिवाय कोणतेही बियाणे पेरणीयोग्य समजू नये. ग्लासभर पाण्यात किंवा पातेल्यात तातडीची (पाच मिनीटात ) उगवण क्षमता तपासण्याची पद्धत त्यांनी यावेळी सांगितले.तपासणी मध्ये ६५ टक्के उगवण क्षमता असेल तर एकरी अर्धा किलो बियाणे वाढ करावी व दोन ओळीतील अंतर १८ इंचावर ठेवावे.

६० टक्के उगवण क्षमता असेल तर पाच किलो बियाणे वाढ करावी. बुरशीनाशक, कीटकनाशक यांचा वापर करावा. गत हंगामात चक्रीभुंग्याच्या उपद्रवाला शेतकऱ्याला सामोरे जावे लागले. बीजप्रक्रिया केल्यामुळे खोडमाशी व अन्य रोगाचा उपद्रव कमी होतो. नंतर जैविक औषधांचा वापर करावा. पेरणीनंतर लगेच किंवा दुसरे दिवशी तणनाशक फवारावे किंवा चार पानावर आल्यावर तननाशक फवारावे.पुढील कांद्यासारख्या संवेदनशील पिकाला हानिकारक ठरेल असे तणनाशक सोयाबीनमध्ये फवारु नये असेही स्पष्ट केले.

कृषी अधिकारी विशेषज्ञ निलेश बिबवे यांनी चांगल्या पावसानंतरच पेरणी करावी तसेच जैविक बिजप्रक्रिया व रासायनिक बीजप्रक्रिया याबाबत माहिती देताना रायझोरीयमच्या गाठीचे महत्व पटवून दिले. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पाऊस सरासरी पेक्षा कमी होण्याची शक्यता आहे त्यासाठी कमी दिवसात (९३ दिवस) तयार होणारा वाण निवडावा.बी बी एफ पेरणी करतांना बेसल डोस पेरून द्यावा.दशपर्णी,जीवामृतचा वापर करावा त्यामुळे २५ टक्के डोस कमी लागतो.

मका पिकासाठी कोणती खते वापरावी झिंक सल्फेट किती वापरावे खते कशी द्यावी लष्करी अळीच्या संदर्भात कशी काळजी घ्यावी याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कृषी सहाय्यक मीनाक्षी बढे यांनी केले. प्रगतशील शेतकरी मदन चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास कृषी विभागाचे उप कृषी अधिकारी एस. एल. कदम, सहा. कृषी अधिकारी भारती दहीमीवाळ, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक मीनाक्षी बढे, सहा.तंत्रज्ञान व्यवस्थापक अभिषेक मानकर, पाणी फाउंडेशनच्या ज्योती ठाकरे, सुर्यवंशी, उमेदचे डांगे, सरपंच छाया लक्ष्मण बर्डे, शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आश्वी बुद्रुक येथे प्रवरेच्या कृषीदुतांचे आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे कृषी महाविद्यालय,लोणी येथील कृषीदुतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीदुतांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदामंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील कृषी शिक्षण संचालक डॉ.उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ.अमोल खडके, कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीदूत देवेंद्र शिंदे, सोहम शिंदे, ओंकार शिंदे, अनिकेत चोरमले, बाळासाहेब जवरे हे आश्वी बुद्रुक येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत व त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रामपंचायत आश्वी बुद्रुकचे सरपंच श्री.नामदेव किसान शिंदे उपसरपंच बाळासाहेब नानासाहेब मदने ग्रामपंचायत लिपिक विजय रामचंद्र आवारे, ग्रामपंचायत अधिकारी गौतम जानेकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदाम शिरसाठ इतर ग्रामस्थ यांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून ह्या कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदी संदर्भात माहिती देणार आहे.



## रसायनयुक्त हातभट्टी दारूचा सुळसुळाट; कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली :** वाघोली, लोणीकंद आणि परिसरातील नदीकाठ भागात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या दारूमध्ये विविध रासायनिक पदार्थांचा वापर होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.भावडी, तुळापूर, आष्टापूर, मांजरी तसेच लोणीकंद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील काही भागांमध्ये अवैध दारू निर्मितीचे अड्डे सुरू असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गूळ व दारूनिर्मितीसाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमती वाढल्याने काही अवैध व्यावसायिकांकडून १०० ते २०० लिटर गरम पाण्यात विविध रसायने मिसळून गावठी हातभट्टी दारू तयार केली जात आहे. ही दारू अत्यंत घातक असल्याने तिचे सेवन करणाऱ्यांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे. या अवैध व्यवसायाला काही भ्रष्ट घटकांचे संरक्षण मिळत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. तसेच कारवाईची माहिती आधीच संबंधितांपर्यंत पोहोचत असल्याने छाप्यांदरम्यान ठोस पुरावे अथवा साहित्य हाती लागत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे अवैध हातभट्टी दारू व्यवसायाविरोधातील कारवाई प्रभावी ठरत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. रू विक्रीची ठिकाणे : स्थानिकांच्या माहितीनुसार वाघोलीतील गोरे वस्ती, चार नंबर परिसर, पाच नंबर परिसर, खान वस्ती, व्हीटीपीजवळील भाग, चौखी ढाणी रोड, बाजारतळ परिसर, वाघोली-खराडी मार्गावरील लेबर कॅम्प तसेच अप्पर खराडीतील विविध बांधकाम प्रकल्पांच्या परिसरात अवैध दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप आहे.

## पान १ वरुन

### विराटची विरासत...

ओळखल्या जाणाऱ्या विराट कोहलीने अंतिम सामन्यात जबरदस्त अर्धशतक झळकावत आरसीबीच्या डावाचा कणा सांभाळला. अवघ्या २५ चेंडूंमध्ये त्याने अर्धशतक पूर्ण करत आयपीएल अंतिम सामन्यातील सर्वात वेगवान फिफ्टीचा विक्रम आपल्या नावावर केला. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे गुजरातच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासून दबाव निर्माण झाला. गेल्या हंगामात तब्बल १८ वर्षांची प्रतीक्षा संपवत पहिले विजेतेपद जिंकलेल्या आरसीबीने यंदाही शानदार कामगिरी करत सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी उंचावली. क्वालिफायरपासून अंतिम सामन्यापर्यंत संघाने सातत्यपूर्ण आणि आक्रमक खेळ करत पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली. आयपीएलच्या इतिहासात अनेक संस्मरणीय खेळी करणाऱ्या विराट कोहलीने आणखी एक सुवर्ण अध्याय आपल्या कारकिर्दीत जोडला आहे. निर्णायक सामन्यात संघाला विजय मिळवून देत त्याने पुन्हा एकदा आपणच 'किंग कोहली' असल्याचे सिद्ध केले. आरसीबीच्या या ऐतिहासिक विजयामुळे क्रिकेटविश्वात नव्या युगाची सुरुवात झाल्याची चर्चा रंगू लागली असून, सलग दोन विजेतेपदांमुळे आता बेंगलोरचा संघ आयपीएलमधील सर्वात बलाढ्य संघांपैकी एक म्हणून ओळखला जात आहे. 'ई साला'चा जल्लोष देशभर विजयाचा क्षण निश्चित होताच स्टेडियममध्ये लाल जर्सीधारी चाहत्यांचा जल्लोष उसळला. ई साला कप नमदूच्या घोषणा पुन्हा एकदा दुमदुमल्या. बंगळुरूपासून दिल्ली, मुंबई, पुणे आणि देशातील अनेक शहरांमध्ये चाहत्यांनी फटाके फोडून आणि मिरवणुका काढून आनंद साजरा केला. सोशल मीडियावरही विराट कोहली आणि आरसीबी ट्रेंडमध्ये राहिले.

### चौंडी विकास आराखड्यास निधी कमी पडू देणार नाही : एकनाथ शिंदे

आदर्श होता. राज्य सरकारने चौंडी विकास आराखड्यासाठी १२०० कोटी रुपये मंजूर केले. या परिसराचा चेहरामोहरा बदलण्याचा शब्द मी दिला आहे. तो कोणत्याही परिस्थितीत पाळणार. यंदा काम पाऊस कमी पडला तरी महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाहीउपमुख्यमंत्री सुमित्रा पवार म्हणाल्या, राज्यातील पहिली उपमुख्यमंत्री म्हणून मला चौंडी येथे येऊन नतमस्तक होण्याचा मान मिळाला. चौंडीसाठी अजित पवार अर्थमंत्री असताना मोठे योगदान दिल्याची आठवणही त्यांनी दिली. येथील विकासकामांसाठी सरकार पूर्ण मदत करेल, मात्र ही कामे दर्जेदार व्हावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

स्वागताध्यक्ष सभापती राम शिंदे यांनी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी १२०० कोटींच्या आराखड्याला मंजुरी मिळाली. कामांची निविदा प्रसिद्ध झाली आहे. मात्र आचारसंहिता संपताच भूमिपूजन करण्यात येईल. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या परवानगीने जयंती महोत्सव साजरा केला जात आहे. माजीमंत्री अण्णासाहेब डांगे, आमदार पडळकर यांचे भाषणे झाली.

कर्जमाफीचा लाभ १० दिवसात कृषीमंत्री

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, चौंडी विकासाचा बाराशे कोटीचा आराखडा बनवताना उपमुख्यमंत्री असताना अजित पवार यांनी मोठी मदत केली. कृषी विभागाच्या माध्यमातून मेंढपाळासाठी वेगळी य़ोजना आणण्याचा प्रयत्न आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या कर्जमाफीची योजनेचा आठ ते दहा दिवसात शेतकऱ्यांना लाभ दिला जाईल. मुख्यमंत्री आले आणि लगेच गेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सकाळी हेलिकॉप्टरने चौंडी येथे आले. त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जन्मस्थळी असणाऱ्या महादेवाच्या मंदिरामध्ये जाऊन अभिषेक केला. अहिल्यादेवींना अभिवादन केले. त्यानंतर होणाऱ्या अभिवादन सभेला न थांबता त्यांना तात्काळ नवी दिल्ली येथे जावयाचे असल्यामुळे पत्रकारांशी संवाद साधून ते रवाना झाले.

## खंडाळा येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली प्रथम पूजन करून पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला व अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो अशा घोषणा देत अभिवादन करण्यात आले याप्रसंगी चंद्रभान ढगे, शिवाजी जानराव, भाऊसाहेब जानराव, बाळकृष्ण बढे, कचरु जानराव, निवृत्ती ढगे,सत्तार कुरेशी, संजय सूर्यवंशी, रमेश जेजुरकर, नितीन बागुल,अशोक शिंदे,प्रल्हाद सुर्यवंशी, दिनकर कटारे,राजेंद्र जानराव, गणेश ढगे, सतिष कवार, सुनील घनवट, विजय ढगे, संतोष जानराव, महेश ढगे, विक्रम जानराव,राहुल ढगे, विजय कवार, दिपक कवार, गणेश बाळु ढगे,शिवाजी बढे, गणेश जानराव,सुभाष वाघचौरे,सिताराम घायवट, उत्तम जानराव, संतोष ढगे,तुळशीराम जानराव,यश ढगे, आदी उपस्थित होते



## निधन वार्ता

### रावसाहेब हरिश्चंद्रे



**श्रीरामपूर :** तालुक्यातील उक्कलगाव येथील रावसाहेब आसाराम हरिश्चंद्रे (वय ५५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजयी, दोन बहिणी, दोन मुले, पुतणे, सून असा मोठा परिवार आहे. विश्वास व किरण यांचे ते वडील तर, खडांबे येथील भाऊसाहेब हरिश्चंद्रे यांचे ते बंधू होत.

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME NALBAND ZAID ZUBAIR ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS ZAID ZUBER SHAIKH (AADHAR NO. 9802 2455 0935) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE: KOPARGAON DATE : 30/05/2026

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि . १ जून २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२० ६३० ५८० | ३-३ | १२६ ३४९ ३०० | जोड ३१-६३-५४-९६-९२ |

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| २३८ १२० ३३७ | ३-१ | १४६ १२८ १०० | जोड ३६-७१-४९-५२-१० |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-४ | १३० २४८ ४४६ | जोड ५१-६४-७२-०९-४३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | 2 1 | 8 5 | 8 2 | 1 3 | 1 |
| To | 3 16 | 4 6 56 | 8 7 05 | 8 4 43 | 4 3 09 | 3 |
| 13/03/2026 | 6 | 0 8 | 0 8 | 9 8 | 8 4 | 5 |
| 16/03/2026 | 4 | 8 2 | 3 4 | 4 1 | 1 6 | 3 |
| to | 5 56 | 9 0 21 | 8 6 02 | 9 2 02 | 3 7 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | 9 0 | 0 0 | 9 7 | 8 0 | 8 |
| 23/03/2026 | 6 | 3 4 | 1 5 | 7 1 | 2 3 | 1 |
| to | 8 34 | 5 5 46 | 7 6 03 | 8 3 46 | 4 3 64 | 6 |
| 27/03/2026 | 9 | 6 5 | 8 9 | 8 0 | 0 0 | 7 |
| 30/03/2026 | 2 | 1 1 | 1 2 | 1 1 | 1 1 | 2 |
| to | 8 90 | 3 3 87 | 6 7 97 | 1 1 12 | 5 6 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | 6 4 | 0 0 | 9 9 | 6 9 | 9 |
| 06/04/2026 | 1 | 2 1 | 7 1 | 4 3 | 1 1 | 4 |
| to | 3 70 | 2 4 02 | 7 3 98 | 7 5 82 | 5 2 78 | 6 |
| 10/04/2026 | 3 | 6 5 | 8 5 | 7 0 | 6 4 | 8 |
| 13/04/2026 | 5 | 1 1 | 6 2 | 5 1 | 8 2 | 1 |
| to | 6 06 | 5 4 43 | 7 3 45 | 0 3 77 | 9 6 85 | 4 |
| 17/04/2026 | 9 | 0 9 | 0 9 | 0 3 | 0 0 | 0 |
| 20/04/2026 | 5 | 1 8 | 4 1 | 3 5 | 3 3 | 3 |
| to | 7 00 | 2 8 58 | 5 2 53 | 5 5 71 | 8 4 68 | 7 |
| 24/04/2026 | 8 | 7 9 | 9 2 | 5 7 | 0 9 | 8 |
| 27/04/2026 | 3 | 1 4 | 7 1 | 1 6 | 1 6 | 2 |
| to | 5 63 | 2 4 85 | 8 6 71 | 2 7 29 | 9 8 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | 0 0 | 0 0 | 8 9 | 9 8 | 0 |
| 04/05/2026 | 1 | 3 1 | 6 2 | 2 2 | 2 2 | 2 |
| to | 7 71 | 9 4 34 | 8 3 48 | 7 4 25 | 5 4 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | 9 8 | 0 9 | 9 6 | 8 0 | 9 |
| 11/05/2026 | 5 | 2 3 | 2 6 | 2 1 | 1 4 | 1 |
| to | 6 79 | 7 7 04 | 3 0 68 | 3 9 01 | 2 7 85 | 5 |
| 15/05/2026 | 6 | 0 0 | 9 0 | 3 0 | 8 7 | 9 |
| 18/05/2026 | 8 | 4 5 | 1 1 | 1 7 | 4 2 | 2 |
| to | 9 79 | 5 6 96 | 7 4 22 | 2 8 30 | 8 8 93 | 5 |
| 22/05/2026 | 0 | 0 8 | 8 7 | 9 8 | 8 9 | 6 |
| 25/05/2026 | 5 | 2 3 | 1 8 | 4 1 | 2 4 | 5 |
| to | 6 11 | 9 4 37 | 3 9 78 | 6 9 05 | 5 6 06 | 5 |
| 29/05/2026 | 0 | 0 6 | 3 0 | 8 0 | 8 0 | 6 |
| 01/06/2026 | | | | | | |
| to | | | | | | |
| 05/06/2026 | | | | | | |

द • ख • ल

## साईदीप हिरोज व एसकेबी संघांचा दणदणीत विजय; अंतिम फेरीत धडक



**अहिल्यानगर** : येथील वाकोडी परिसरातील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या १२ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेत शनिवारी रंगतदार उपांत्य सामने खेळविण्यात आले. दोन्ही सामन्यांत खेळाडूंच्या उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजीचा थरार पाहायला मिळाला. पहिल्या उपांत्य सामन्यात टॉपर्स क्रिकेट अकॅडमी व साईदीप हिरोज यांच्यात लढत झाली. प्रथम फलंदाजी करत साईदीप हिरोज संघाने २५ षटकांत ५ बाद १३९ धावांचा भक्कम डोंगर उभारला. संघाकडून आदित्य इथापे याने शानदार फलंदाजी करत ७५ धावांची दमदार खेळी साकारली. विजयासाठी १४० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या टॉपर्स क्रिकेट अकॅडमी संघाला साईदीप हिरोजच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरता आला नाही. संपूर्ण संघ १७.१ षटकांत अवघ्या ४१ धावांवर गारद झाला. त्यामुळे साईदीप हिरोज संघाने तब्बल ९८ धावांनी दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. उत्कृष्ट फलंदाजीबद्दल आदित्य इथापे याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात आर एल अकॅडमी व एसकेबी संघ आमनेसामने आले. प्रथम फलंदाजी करत आर एल अकॅडमी संघाने ९ गड्यांच्या मोबदल्यात ११६ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात एसकेबी संघाने आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन करत १८.२ षटकांत १ बाद ११८ धावा पूर्ण केल्या आणि ९ गडी राखून सहज विजय मिळवला. संघाकडून धनंजय जरे याने ४१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला. या स्पर्धेमुळे लहान वयोगटातील क्रिकेटपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत असून क्रिकेटप्रेमींमध्येही स्पर्धेबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## निमगाव वाघा येथे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



**अहिल्यानगर** : निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाउंडेशन ट्रस्ट आणि भुसारे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींच्या जीवनकार्याची माहिती देऊन त्यांच्या विचारांचा आदर्श अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याला व कर्तृत्वाला उजाळा देत समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, भुसारे कोचिंग क्लासेसच्या संचालिका सुषमा भुसारे, युवराज भुसारे, बाळू डोंगरे, जयसिंग गायकवाड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतुल फलके म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजातील अनेक अनिष्ट प्रथा, रूढी आणि परंपरांना धैर्याने छेद देत लोककल्याणकारी राज्याची निर्मिती केली. महिलांना सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. राज्यकारभार करताना त्यांनी जनतेच्या अडचणी समजून घेत त्यांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले. त्यांच्या प्रशासनात न्याय, पारदर्शकता आणि लोकहिताला सर्वोच्च महत्त्व होते.

## मनपा कर्मचारी सह. पतसंस्थेची ११४ वी वार्षिक सभा संपन्न

**सभासदांना १० टक्के लाभांश; ७३ लाखांचा नफा, २९.५० कोटी रुपयांचे कर्जवाटप, ८ कोटींच्या ठेवींसह 'अ' वर्ग ऑडिट**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चौरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, विकास गीते, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, संचालिका प्रमिलाताई पवार, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी, अकाउंटंट संतोष गवळी यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेचे वाचन केले. त्यानंतर विषयपत्रिकेतील सर्व विषय सभासदांनी एकमताने मंजूर केले. पतसंस्थेला यंदाही 'अ' वर्ग ऑडिट प्राप्त झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, पतसंस्थेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न होत असून संस्थेच्या प्रगतीमागे सभासदांचा विश्वास आणि संचालक मंडळाचा पारदर्शक कारभार हेच प्रमुख कारण आहे. चालू आर्थिक वर्षात संस्थेने सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केला आहे. तसेच संस्थेमार्फत २९ कोटी ५० लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले असून संस्थेचे भागभांडवल ५ कोटी १६ लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहे. संस्थेकडे सुमारे ८ कोटी रुपयांच्या ठेवी असून यावर्षी संस्थेला ७३ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. याशिवाय मयत सभासदांच्या कुटुंबियांना दिलासा देण्यासाठी ११ लाख ५० हजार ७०० रुपयांची कर्जमाफी करण्यात आली. वैद्यकीय मदत म्हणून तीन सभासदांना ७५ हजार रुपयांची आर्थिक मदतही देण्यात आली. पतसंस्था केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित नसून सामाजिक बांधिलकीही जपत आहे. सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार सोहळा आयोजित करून त्यांच्या यशाचे कौतुक केले जाते.

# सचिन जगताप यांना उमेदवारी द्यावी

## अन्यथा राष्ट्रवादीचा वेगळा विचार : गणेश भोसले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीची घोषणा होताच जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडत माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप हे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक मध्ये दोनदा अपक्ष निवडून आले होते त्यांना व आमदार संग्राम जगताप यांना निवडणूक करण्यासंदर्भाची चांगली हातोटी आहे सर्वांबरोबर चांगले संबंध असून त्यांच्या कुटुंबीयांचा या जागेवर पहिला हक्क असल्याचे स्पष्ट केले.तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने नगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे घेऊन आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांना उमेदवारी देण्यात यावी, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक या निवडणुकीत मतदानासंदर्भात वेगळा विचार करतील, असा इशाराही त्यांनी दिला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आपल्या मुलाच्या उमेदवारीसाठी झटत आहे पक्षातील नेते आपल्या मतदारसंघा पुरतेच मर्यादित राहिले तर पक्षाची अवस्था राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटासारखी होईल होईल

गणेश भोसले पुढे म्हणाले की, स्वर्गीय अरुणकाका जगताप हे दोन वेळा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेले होते. त्यांनी जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मजबूत संघटना उभी केली. त्यामुळे या निवडणुकीत त्यांच्या कुटुंबीयांचा नैतिक आणि राजकीय हक्क सर्वप्रथम विचारात घेतला गेला पाहिजे. सचिन जगताप यांना



उमेदवारी देऊन त्यांच्या कुटुंबाच्या योगदानाचा सन्मान करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या मागील महाविकास आघाडी सरकारमधील मंत्रीपदाच्या वाटपावरही भाष्य केले. ते म्हणाले की, त्या काळात आमदार संग्राम जगताप यांचा मंत्रीपदावर ठोस दावा असतानाही त्यांना डावलण्यात आले. त्याऐवजी पहिल्यांदाच निवडून आलेल्या प्राजक्त तनपुरे यांना मंत्रीपद देण्यात आले. आज ते कोणत्या राजकीय पक्षात आहेत, हे संपूर्ण राज्य पाहत आहे. त्या निर्णयाचे परिणाम आज स्पष्टपणे दिसत असून, निष्ठावंतांना डावलल्यामुळेच पक्षाची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोत अशी 'टीका त्यांनी केली.

भोसले पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पाळेमुळे रुजविण्याचे आणि त्याचा वटवृक्ष करण्याचे मोठे काम आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे. तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रियता असलेले, संघर्षशील आणि तडफदार नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वर्गीय अजितदादा पवार यांचाही त्यांना मंत्री करण्यासाठी प्रबळ आग्रह होता. मात्र, एका मामाच्या हट्टापायी शेवटच्या टप्प्यात त्यांना डावलण्यात आले आणि कारखानदारीला प्राधान्य देण्याचा निर्णय शरद पवार गटातील नेतृत्वाने घेतला.

त्यांनी आरोप केला की, जनाधार, संघर्ष आणि कार्यकर्त्यांची ताकद एका बाजूला ठेवून वारसाहक्काच्या राजकारणाला महत्त्व देण्यात आले. कार्यकर्त्यांच्या भावना आणि जनतेचा कौल दुर्लक्षित करून एका भाच्याला पुढे केले गेले. आज तोच भाचा सत्तेच्या लोभासाठी भाजपमध्ये जात असल्याचे चित्र दिसत आहे. ज्यांच्या आशीर्वादाने राजकीय उंची मिळाली, त्यांच्याच राजकीय भूमिकेला छेद देण्याचे काम सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली.

मंत्रीपद मिळाल्यानंतर मतदारसंघ, पक्ष संघटना आणि कार्यकर्त्यांसाठी नेमके काय योगदान दिले गेले, याचे उत्तर आजही अनेकांना मिळालेले नाही. सत्तेच्या समीकरणांसाठी पक्ष बदलण्याची वेळ येणे ही दुर्दैवी बाब असून, शरद पवार गटाने कर्तृत्वापेक्षा घराणेशाहीला दिलेले प्राधान्य, निष्ठावंत कार्यकर्त्यांवर झालेला अन्याय आणि जनाधार असलेल्या नेतृत्वाकडे केलेले दुर्लक्ष यामुळेच त्या पक्षाची आजची अवस्था निर्माण झाली असल्याचा दावा त्यांनी केला.

शेवटी गणेश भोसले म्हणाले की, राजकारणात जे पेरले जाते तेच उगवते. निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करून घेतलेल्या निर्णयांचे परिणाम आज सर्वांसमोर आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत योग्य न्याय झाला पाहिजे, अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रावर शिक्षकाची नोकरी

### अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शासनाची दिशाभूल करून कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे ८० टक्के प्रकल्पग्रस्ताचा दाखला मिळवून शिक्षक सेवक पदाचा लाभ घेतलेल्या शिक्षकाला तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, तसेच शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. या प्रकरणात ठोस कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

समितीने दिलेल्या निवेदनानुसार, सध्या आलेगाव अंतर्गत हनुमानवाडी जिल्हा परिषद शाळा, ता. श्रीगोंदा येथे कार्यरत असलेल्या एका शिक्षकाने इतर मागास प्रवर्गातील ८० टक्के प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊन शिक्षक सेवक पद मिळविले. मात्र, ते प्रत्यक्षात प्रकल्पग्रस्त नसताना कथितपणे बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र मिळवून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सदर शिक्षकाचे कुटुंबीय हे मूळचे भांडगाव (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी असून त्यांची वडिलोपार्जित मालमत्ता व जमिनीची नोंद तेथे आहे. असे असताना त्यांनी २००९ मध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बीड यांच्याकडे अर्ज करून आपण बीड जिल्ह्यातील कळसंबर गावातील सर्व्हे क्रमांक ३४१ मधील जमीनधारक असल्याचे दर्शविले. संबंधित जमीन पाझर तलाव प्रकल्पासाठी संपादित झाल्याचा दावा करत त्यांनी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळविल्याचे समितीचे म्हणणे आहे. समितीच्या आरोपानुसार, ज्या सर्व्हे क्रमांकाचा आधार घेऊन प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळविण्यात आले, त्या जमिनीशी त्यांच्या कुटुंबीयांचा कोणताही संबंध नव्हता. तसेच बीड जिल्ह्यात त्यांच्या पूर्वजांची अथवा नातेवाईकांची कोणतीही नोंद उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. महसूल अभिलेख, सातबारा उतारे आणि जुन्या सरकारी दस्तऐवजांची पडताळणी केल्यानंतरही संबंधित ठिकाणी त्या कुटुंबाचे नाव आढळून आले नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## २५ दिवसात ९२९ ठिकाणी छापेमारी

### एस. पी. सुदर्शन यांची धडाकेबाज कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्हा पोलीस अधीक्षकपदी रुजू होताच मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गुन्हेगारीच्या साखळीवर थेट प्रहार सुरू केला आहे. १ मे रोजी पदभार स्वीकारल्यानंतर एसपी सुदर्शन यांनी कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी 'क्रॉस रेड'चा नवा आणि प्रभावी फॉर्म्युला राबविला आहे.

गेल्या २५ दिवसांत पोलिसांनी जिल्ह्यात मटका, जुगार, अवैध दारू, वाळूतस्करी आणि गुटख्याच्या अड्ड्यांवर ९२९ पेक्षा जास्त ठिकाणी जोरदार छापेमारी केली आहे. या धडक मोहिमेमध्ये सुमारे ४ कोटी ३३ लाख ८५ हजार रुपयांचा मोठा



मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक पोलिसांकडून माहिती फुटू नये म्हणून एका पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुसऱ्या ठाण्याच्या पोलिसांना पाठवून या कारवाया अत्यंत गोपनीयतेने आणि अचूकपणे करण्यात आल्या. यामध्ये नगर तालुका आणि कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत भिंगार कॅम्पच्या पोलिसांनी धाडी टाकल्या. या धाडसत्रामुळे अवैध व्यावसायिकांसह पोलीस दलातील काही कर्मचाऱ्यांमध्येही मोठी धास्ती निर्माण झाली आहे.

या मोहिमेअंतर्गत गावठी कट्ट्यांच्या चार वेगवेगळ्या कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण ७ कट्टे आणि १५ जिवंत राऊंड जप्त केले असून, या प्रकरणी एकूण ८ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हेगारीचे आर्थिक कंबरडे मोडण्यासाठी ही मोहीम अशीच सुरू राहणार असून, नागरिकांनी कोणत्याही अवैध धंद्याची माहिती थेट एसपी सरांशी संपर्क साधून द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त हरदिनचे वृक्षारोपण



**अहिल्यानगर** : हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच अध्यात्म, समाजप्रबोधन आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ह.भ.प. पूजाताई आळकुटे-माने यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्ववान महिला गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात छावणी परिषदेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रमेश साके यांच्या सेवानिवृत्तीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी संजय सपकाळ, सचिन चोपडा, विजय माने, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, माधवी माळगे, मीनाताई परदेशी, रजनी ताई परदेशी, प्रांजली सपकाळ, शितलताई भापसे, जहीर सय्यद, रमेश वराडे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## तुझं हद्दीत, माझं हद्दीत संपलं

### एकमेकांच्या कार्यक्षेत्रात कारवाया करून पोलीस निरीक्षकांची 'भांडाफोड'

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा : ही केस माझी ती कारवाई तुमची अशा फाईल ढकलण्याच्या जुनाट पोलीसी परंपरेला आता कुणीतरी ब्रेक लावल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. कारण, गेल्या काही दिवसांत श्रीगोंदा आणि बेलवंडी पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांच्या कार्यक्षेत्रात थेट उतरून केलेल्या कारवायांनी गुन्हेगारांचेच नव्हे तर 'सेटिंग संस्कृती'चेही धाबे दणाणले आहेत.**

विशेष म्हणजे, श्रीगोंदा पोलीस निरीक्षकांनी बेलवंडी हद्दीत कारवाई केली, तर बेलवंडी पोलीस निरीक्षकांनी श्रीगोंदा परिसरात धाड टाकत अवैध धंदेवाल्यांना झटका दिला. हद्द कोणाची? यापेक्षा गुन्हेगार कोण? हा प्रश्न महत्त्वाचा मानत दोन्ही अधिकाऱ्यांनी घेतलेली आक्रमक भूमिका सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

जिल्ह्यात नुकतेच रुजू झालेले पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या कामकाजाची छाप आता थेट तालुका पातळीवर दिसू लागल्याचे बोलले जात आहे. गुन्हेगारांना जिल्ह्याच्या सीमा नसतात, मग कारवाईला हद्दींची बंधने का? अशा विचारानेच पोलिसांना मुक्त हात देण्यात आल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे. पूर्वी एखाद्या प्रकरणात ते आमच्या हद्दीत नाही हे वाक्य नागरिकांना हमखास ऐकायला मिळायचे. तक्रारदार हेलपाटे मारायचा आणि गुन्हेगार मात्र निवांत फिरायचा. पण आता चित्र उलटताना दिसत आहे. पोलिसांची पथके थेट दुसऱ्या ठाण्याच्या कार्यक्षेत्रात जाऊन माहिती गोळा करत आहेत, धाडी टाकत आहेत आणि अवैध व्यवसायांवर कारवाई करत आहेत.तालुक्यातील अवैध दारू, माती तस्करी, जुगार, लॉजिंगमधील गैरप्रकार आणि स्थानिक पातळीवरील गुन्हेगारी साखळीवर यामुळे दबाव वाढल्याचे सांगितले जात आहे. एक पोलीस स्टेशन मॅनेज केलं तरी दुसरं येऊन उभं राहतं, अशी कुजबुज आता अवैध धंदेवाल्यांत ऐकू येत आहे. गावकुसात तर लोक मिश्कीलपणे म्हणू लागलेत आता गुन्हेगारांनी गुगल मॅप अपडेट करून ठेवावं; पोलीस कुठूनही येऊ शकतात! पोलीस दलातील समन्वय वाढल्यास गुन्हे उघडकीस येण्याचा वेग वाढतो, हे या कारवायांतून दिसून येत आहे. काही नागरिकांनी या पद्धतीचे स्वागत केले असून, हद्दींच्या भिंती तोडून काम करणारे पोलीसच प्रभावी ठरतात, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. दरम्यान, या धडाकेबाज कारवायांमुळे अनेक 'स्थानिक संरक्षकां'चीही झोप उडाल्याचे बोलले जात आहे. कारण, एका ठिकाणी दबाव टाकून कारवाई रोखण्याची जुनी सवय आता चालणार नसल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.पोलीस दलात शिस्त, समन्वय आणि आक्रमक अंमलबजावणी यांचा संगम दिसू लागला तर सामान्य नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, एवढं मात्र नक्की. पोलीस स्टेशन वेगवेगळी पण कारवाई एकच हा नवा फॉर्म्युला जिल्ह्यात किती काळ टिकतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### बनावट गोळीबार प्रकरणाचा छडा लावणाऱ्या

# पोलीस अधिकाऱ्यांचा शिवसेनेकडून गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानासमोर घडलेल्या कथित गोळीबार आणि हल्ला प्रकरणाचा पर्दाफाश करून फिर्यादीच या कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचे उघड करणाऱ्या पोलीस दलाचा शिवसेनेच्या वतीने गौरव करण्यात आला. पोलीस अधीक्षक कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक जगदिश भांबळ, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्यासह तपास पथकातील अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

**काही हॉस्पिटलकडून गंभीर दुखापतीच्या प्रमाणपत्रांचा गैरवापर**

शहरात कुठेही मारहाणीची घटना घडली की गंभीर दुखापतीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी काही ठरावीक हॉस्पिटलमध्ये धाव घेतली जाते, असा गंभीर आरोप शिवसेनेने केला आहे. संबंधित हॉस्पिटलमधील काही डॉक्टर राजकीय किंवा अन्य दबावाखाली किरकोळ मारहाणीच्या घटनांनाही गंभीर दुखापतीचे स्वरूप देणारी प्रमाणपत्रे देत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे खोटे गुन्हे दाखल होण्यास वाव मिळत असल्याचे सांगत अशा प्रकारांचा पर्दाफाश करण्यात येणार असून संबंधित हॉस्पिटलचा परवाना रद्द करण्याची मागणीही करण्यात येणार असल्याचे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, शहरप्रमुख संभाजी कदम, नगरसेवक दत्तात्रय कावरे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, शंकर शेळके, अशोक शेळके, सागर गलांडे, शिवराज गलांडे, प्रवीण गीते यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानासमोरील गोळीबार आणि हल्ला प्रकरणाने काही दिवसांपूर्वी शहरात खळबळ उडवून दिली होती.



मात्र, पोलीसांनी अत्यंत बारकाईने आणि तांत्रिक तपासाच्या आधारे या प्रकरणाची उकल केली. तपासादरम्यान फिर्यादी चिरंजीव गाढवे यानेच स्वतःवर हल्ला घडवून आणण्यासाठी सुपारी देत बनावट गुन्ह्याचा कट रचल्याचे निष्पन्न झाले आहे. या कटामागे युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांना गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न असल्याचेही तपासात समोर आले. मात्र, पोलीसांच्या निष्पक्ष आणि सखोल तपासामुळे सत्य बाहेर आले आणि हा कथित कट उधळून लावण्यात यश आले. याबद्दल शिवसेनेच्या वतीने पोलीस दलाचे आभार व्यक्त करण्यात आले.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलीस पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल नितिन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुरज वाबळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुमित गवळी, शाकीर सय्यद, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, सतिष शिंदे, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड आणि भागवत बांगर यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले की, गोळीबार आणि हल्ल्याचा बनाव करून शिवसेनेच्या पदाधिकाऱ्याला अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, पोलीस प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न

द • ख • ल

## आधिक मास पौर्णिमेनिमित्त श्री कातोबानाथ मंदिरात आंब्याची आकर्षक आरास



दिवे ता. पुरंदर येथे श्री कातोभानाथ मंदिरात केलेली आकर्षक आरास

**दिवे :** दिवे येथील जागृत देवस्थान श्री कातोबानाथ मंदिरात आधिक मास पौर्णिमेनिमित्त भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने सुयश दिवेकर, दीपक दिवेकर, विजय दिवेकर आणि दिगंबर दिवेकर यांनी मंदिरात आंब्याची आकर्षक व मनमोहक आरास साकारली होती. या आरासने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.दिवे गाव हे बारा वाड्या-वस्त्यांनी बनलेले असून श्री कातोबानाथ मंदिर हे गावकऱ्यांच्या श्रद्धेचे केंद्रस्थान मानले जाते. मंदिरात वर्षभर प्रत्येक पौर्णिमेला एका भावकीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. मात्र तीन वर्षांतून एकदा येणाऱ्या आधिक मास पौर्णिमेनिमित्त गावातील बारा वाड्या-वस्त्यांवरील बारा बलुतेदार समाजाच्या वतीने एकत्रितपणे महाप्रसादाचे आयोजन करण्याची परंपरा आहे. यावर्षीही ही परंपरा उत्साहात जपण्यात आली. सर्व समाजातील भाविकांनी एकत्र येत धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर शेकडो भाविकांनी श्री कातोबानाथांचे दर्शन घेतले यावेळी ऋतिक शितकल, तनुजा शितकल, ऋतुल कुंभार, श्रद्धा कुंभार तसेच सादिक मुलाणी व शाहिन मुलाणी या दाम्पत्यांच्या हस्ते मंदिरात विधिवत पूजा संपन्न झाली. पूजेचे पौराहित्य दीपक गाडेकर यांनी केले. धार्मिक उत्साह, सामाजिक सलोखा आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन यांचा सुंदर संगम या पौर्णिमा सोहळ्यात अनुभवायला मिळाला.यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.....

## घरफोडी प्रकरणातील दोघे सराईत जेरबंद; २.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वाघोली :** मांजरी खुर्द परिसरात रात्रीच्या वेळी घरफोडी व चोरीच्या घटना करणाऱ्या दोन सराईत आरोपींना वाघोली पोलिसांनी अटक करून २ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. गोपनीय माहितीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.मांजरी खुर्द येथे बंद घराचे कुलूप तोडून तसेच दुकानाचे शटर उचकटून चोरी केल्याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना महत्त्वाची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी रोहित हनुमंत राक्षे (वय ३२, रा. मांजरी बुद्रुक) आणि मनोज आनंद गायकवाड (वय २४, रा. सणसवाडी) यांना ताब्यात घेतले.चौकशीदरम्यान आरोपींकडील दुचाकी ही काळे ओढा, वाघोली परिसरातून चोरी केल्याचे निष्पन्न झाले. संबंधित दुचाकी चोरीप्रकरणीही गुन्हा दाखल असल्याची माहिती तपासात समोर आली.या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून ५.६ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५.६२ ग्रॅम चांदीचे दागिने, एक दुचाकी आणि तीन मोबाईल फोन असा एकूण २ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.वाघोली पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरातील घरफोडी आणि चोरीच्या घटनांच्या तपासाला गती मिळाली असून आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रकरणाचा पुढील तपास वाघोली पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

## किमान १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

**मुंबई :** सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी '' शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये ' ऋविजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे

# विषारी दारू प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा द्या

## मृत कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी शासनास्तरावर पाठपुरावा करणार : आ.डॉ. नीलम गोऱ्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणे :** फुगेवाडी व हडपसर परिसरात घडलेल्या विषारी दारू प्रकरणामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून, या घटनेला जबाबदार असलेल्या नराधमांना कठोरातील कठोर शिक्षा देऊन फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार, डॉ. गोऱ्हे यांनी रविवारी फुगेवाडी परिसरात जाऊन अनेक मृतांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. तसेच शिवसेनेच्या वतीने पीडित कुटुंबांना रोख तातडीची आर्थिक मदत सुपूर्द केली. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, इरफानभाई सय्यद, महिला जिल्हा प्रमुख मनिषा परांडे , निलेश हाके, संजय काटे, मनीषा करंडे, अविनाश जाधव, ब्रिजेश नागदेवते, बाबू बापूर, श्रीकांत शेवाळे, करण काळे, सचिन खलसे, शैलेश हाके, गणेश आयाळी, यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१३ कुटुंबांना शिवसेनेचा आधार :**
या दौऱ्यादरम्यान फुगेवाडी येथील अक्षय अशोक अवसरमल, विजय प्रकाश राठोड, राजेंद्र प्रकाश राठोड, आनंद काशिनाथ निकाळजे, आनंद पांडेराव देसाई, अकबर अझीमखान पठाण, राजेश शांताराम राजपूत, सचिन रामचंद्र नेटके आणि बाबा सैय्यद हुसेन शेख यांच्या शोकाकुल कुटुंबांना भेटून मदत देण्यात आली. हडपसरयेथील चार परिवीरांना ३०मे रोजी आ.नीलम गोर्हे यांनी मदत केली आहे. ऊर्वरित हडपसर येथील व फुगेवाडीतील उर्वरित पीडित कुटुंबांनाही लवकरच ऑनलाईन पद्धमदत दिली जाईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. आतापर्यंत दोन्ही भागांतील जवळपास १३ कुटुंबांना मदत करण्यात आली आहे.

केस स्टडी: कर्ते पुरुष गेले, मागे उरला फक्त निराशेचा अंधार!
डॉ. नीलम गोऱ्हे यांनी फुगेवाडीतील पीडित कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेतली असता, या दुर्घटनेची अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक बाजू समोर आली आहे:

**अल्पशिक्षित महिला आणि रोजगाराचा प्रश्न:**
या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले बहुतेक सर्वजण कुटुंबातील एकमेव कमावते (कर्ते) पुरुष होते. अनेक घरांमध्ये आता केवळ महिला, लहान मुले आणि वृद्ध सदस्यच उरले आहेत. महिलांचे शिक्षण कमी असल्याने त्यांना तात्काळ रोजगार मिळणे कठीण झाले असून, उद्यापासून घर कसे चालवायचे, हा यक्षप्रश्न त्यांच्यासमोर आहे.

**मुलांचे शिक्षण धोक्यात:**
वडिलांचे छत्र हरपल्यामुळे लहान मुलांच्या शालेय शिक्षणावर, आरोग्यावर आणि दैनंदिन उदरनिर्वाहावर मोठे संकट कोसळले आहे.

**वृद्ध आणि दिव्यांगांचे हाल:**
काही कुटुंबांमध्ये वृद्ध आई-वडील किंवा दिव्यांग सदस्य आहेत, ज्यांना सांभाळणारे आता कोणीही राहिलेले नाही.

निष्कर्ष: यावरून स्पष्ट होते की, केवळ एकवेळची आर्थिक मदत देऊन या कुटुंबांचे प्रश्न सुटणारे नाहीत.'दीर्घकालीन पुनर्वसन पॅकेज' आणि प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला शाश्वत रोजगार मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

**''केवळ हातभट्टी नव्हे, विषारी पुरवठा साखळीचा तपास व्हावा'' :**
माध्यमांशी बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ''महाराष्ट्रात अशा घटना घडल्यानंतर प्रत्येक वेळी विधिमंडळात चर्चा होते. मात्र, अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा हवी. हा केवळ एका हातभट्टीचा प्रश्न नसून मिथेनॉलसारख्या घातक रसायनांचा पुरवठा कुठून झाला, याची संपूर्ण 'सप्लाय चेन' शोधणे आवश्यक आहे. रासायनिक तपासणी अहवाल तातडीने समोर यायला हवेत आणि सक्षम सरकारी वकील नियुक्त करून खटला जलदगती न्यायालयात चालवला पाहिजे.''

**तक्रारी होऊनही कारवाईत ढिलाई का? पोलिसांवर प्रश्नचिन्ह! :**
पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर तीव्र नाराजी व्यक्त करत डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ''स्थानिक शिवसैनिकांनी यापूर्वी लेखी निवेदने दिली होती. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या (डृझूउ) बैठकीतही हा विषय लावून धरला होता. तरीही पोलिसांचा धाक का निर्माण झाला नाही? छापे टाकल्यानंतरही या हातभट्ट्या पुन्हा सुरू कशा होतात, याची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. केवळ खालच्या अधिकाऱ्यांचे निलंबन करून भागणार नाही, तर यामागील आर्थिक हितसंबंध शोधून दोषींवर कडक कारवाई व्हावी.''

**शासकीय मदतीसोबतच शाश्वत पुनर्वसनासाठी पाठपुरावा :**
राज्य शासनाने मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपये आणि महानगरपालिकेने १ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. यासाठी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या मदतीचे स्वागत करतानाच डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, ''हातवर पोट असणाऱ्या या कुटुंबांना तात्पुरती मदत मिळेल, पण पुढच्या जगण्याच्या लढाईसाठी ठोस व्यवस्थेची गरज आहे. शिवसेनेच्या माध्यमातून आम्ही या महिलांना रोजगार आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत.''

**शिवसेना शेवटपर्यंत पाठीशी राहणार!**
''उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना या संपूर्ण परिस्थितीची कल्पना दिली आहे. शिवसेना या पीडित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. आगामी विधिमंडळ आणि संसदेच्या अधिवेशनातही या प्रकरणाचा आवाज उठवून दोषींना फाशीची शिक्षा मिळेपर्यंत आणि पीडितांना पूर्ण न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील,'' अशी ग्वाही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी दिली.

## आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अनुसूचित जातींमधील ५९ घटकांना न्याय्य पद्धतीने आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. तसेच कोणत्याही समाजातील महापुरुषांविषयी अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला माजी मंत्री दिलीप कांबळे, सुभाष जगताप, आमदार अमित गोरखे, अविनाश बागवे, विष्णू कसबे, शंकर तडाखे, पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक कसबे यांच्यासह समाजाच्या कोअर कमिटीचे सदस्य विकास सातारकर, भास्कर नेटके, डॉ. संपत जाधव, सुनील खंडागळे, सचिन जोगदंड, शंकर शेंडगे, ॲड. महेश सकट, संजय केंजळे, दयानंद आढागळे, लक्ष्मण तांदळे आणि समाजातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली असून त्यामुळे आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत अधिक समतोल आणि न्याय्य पद्धतीने पोहोचू शकतो. मात्र, शासनाकडून अद्याप या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजामध्ये नाराजी वाढत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

माजी मंत्री दिलीप कांबळे यांनी आपल्या भाषणात समाजातील महापुरुषांचा अवमान करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. अशा घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, आरक्षण उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने राज्यव्यापी आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## पसायदानातील विचार समाजाला देतात नवी दिशा : चैतन्य महाराज देगलूरकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाच्या माध्यमातून केवळ स्वतःसाठी नव्हे, तर संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. पसायदान हा वारकरी संप्रदायाचा आत्मा असून विश्वबंधुत्व, सद्भावना आणि मानवतेचा संदेश देणारा मंत्र आहे. या विचारांचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. पसायदानातील प्रत्येक ओवी समाजाला नवी दिशा देणारी आहे, असे प्रतिपादन चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. पुरुषोत्तम मासानिमित्त श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्रीगुरु निवृत्तीनाथ महाराजांच्या दरबारात सुरू असलेल्या हरिनाम महोत्सवात भागवत महाराज साळुंखे लिखित 'पसायदान हे!' या ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.चैतन्य महाराज देगलूरकर पुढे म्हणाले, आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात संत ज्ञानेश्वरांचा समतेचा, करुणेचा आणि परस्पर प्रेमाचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. अशा ग्रंथांमुळे नव्या पिढीला संतवाङ्मयाचा परिचय होऊन अध्यात्माकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळते.ज्ञानेश्वर माऊलींनी सद्गुरु निवृत्तीनाथ महाराजांकडे पसायदान मागितले असल्याने या ग्रंथाचे प्रकाशनही त्यांच्या चरणसान्निध्यात व्हावे, अशी भावना प्रमोद महाराज जगताप यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या पुढाकारातून हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. यावेळी माधवदास महाराज राठी, जयंत महाराज गोसावी, एकनाथ महाराज कोष्टी, श्रीपादकाका कुलकर्णी, जयेश महाराज भाग्यवंत, निळोबाराय गोरठाणकर, लक्ष्मण महाराज मोरे, अरविंद सैद यांच्यासह वारकरी संप्रदायातील अनेक कीर्तनकार, प्रवचनकार आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## सीझर झालेल्या महिलांच्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमितपणे करा

### आंबेगाव तालुका राष्ट्रवादी युवक अध्यक्ष विशाल वाबळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वळती :** आंबेगाव तालुक्यात सीझरडरे प्रसूती झालेल्या महिलांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेची सुविधा नियमितपणे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आंबेगाव तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरद पवार गट) अध्यक्ष विशाल वाबळे यांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे निवेदनाडरे केली आहे.

दिलेल्या निवेदनात वाबळे यांनी नमूद केले आहे की, तालुक्यात सीझर झालेल्या महिला लाभार्थ्यांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया वेळेवर व नियमितपणे उपलब्ध होत नसल्याने अनेक महिलांना मानसिक, आर्थिक तसेच आरोग्यविषयक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

या समस्येबाबत २९ ऑगस्ट २०२५ रोजी तालुका आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप वाबळे यांनी केला आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



ग्रामीण भागातील महिलांना शस्त्रक्रियेसाठी वारंवार दवाखान्यांच्या फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना अतिरिक्त आर्थिक खर्चासह शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाच्या कुटुंब कल्याण योजनेचा लाभ पात्र महिलांना वेळेत मिळत नसल्याने आरोग्य विभागाच्या नियोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.ांबेगाव तालुक्यातील सीझर झालेल्या महिलांसाठी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमित व सुरळीतपणे सुरू कराव्यात, यामधील सर्व अडचणी दूर करून योग्य नियोजन करावे आणि पात्र लाभार्थ्यांना तातडीने सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी विशाल वाबळे यांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे केली आहे.

# हातभट्टीची दारु कायमस्वरूपी हद्दपार होणे गरजेचे

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** केवळ राज्यातच नव्हे तर देशभरात सर्रास विक्री जाणारी हातभट्टीची दारू अत्यंत घातक असून ती कायमस्वरूपी हद्दपार करण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी, अशी सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.

पुणे आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणी रसायनयुक्त विषारी दारू घेतल्यामुळे तब्बल २२ जणांचा मृत्यू झाला आहे. आठवले यांनी काही मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मुलांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून पाच लाख रुपये तर महापालिकेकडून एक लाख रुपये मदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मृतांच्या वारसांना नोकरी मिळावी अशी कुटुंबीयांची मागणी असून त्यादृष्टीने महापालिका आयुक्त चर्चा केल्याचेही आठवले यांनी सांगितले. यानंतर पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. यावेळी आरपीआयचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक निलेश आल्हट, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, मोहन जगताप, अशोक गायकवाड, सलीम सय्यद, बसवराज गायकवाड, उमेश कांबळे, संदीप धांडोरे, सोनू निकाळजे, हबीब सय्यद, सुनील गवळी आदी उपस्थित होते.

मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभरात आर्थिक संकट उभे राहिले आहे. देशात या संकटाची व्याप्ती कमी करण्यासाठी सरकारला नाईलाजाने इंधन दरात वाढ करावी लागली आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात महागाई वाढली असून त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना पोहोचत आहे. मात्र, युद्ध समाप्ती दृष्टिक्षेपात असून त्यानंतर इंधनाचे दर निश्चितपणे कमी केले जातील. अर्थातच महागाईला आळा बसण्यास मदत होईल, अशी ग्वाही आठवले यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'महागाई मॅन' असल्याचा लोकसभेतील विविरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांचा आरोप पूर्णपणे बिनबुडाचा असल्याचा दावा आठवले यांनी केला. वास्तविक मोदी हे विकास मॅन आणि देशाची शान असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला काही जातींचा पाठिंबा आहे तर काही जातींचा विरोध आहे. याबाबत आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट करताना आठवले म्हणाले की, सन २०२७



मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या आधारे ५९ हा अनुसूचित जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे, अशी आपली भूमिका आहे.

मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतल्याबद्दल आठवले यांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य सरकार मराठा आरक्षणाच्या बाजूने आहे. केंद्र सरकारने मराठा समाजाला दहा टक्के इडब्ल्यूएस आरक्षण दिलेले आहे राज्यातही ते मिळावे या दृष्टीने राज्य सरकारने पावले उचलावी. कुणबी नोंदी असलेल्या मराठा समाज घटकांना इतर मागास प्रवर्गातून आरक्षण देण्यास हरकत नाही. मात्र, सरसकट मराठा समाजाला या प्रवर्गातून आरक्षण दिल्यास सर्वोच्च न्यायालयाकडून ते नाकारले जाईल, असे आठवले यांनी स्पष्ट केले. रिपब्लिकन पक्षाला सत्तेत वाटा मिळालाच पाहिजे पुरेशा संख्याबळाअभावी रिपब्लिकन पक्षाने विधान परिषदेत उमेदवारीसाठी दावा केलेला नाही. मात्र, रिपब्लिकन पक्षाला विधान परिषदेची एक जागा देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच दिले आहे. त्यानुसार या निवडणुकीत पक्षाला एक जागा मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, ती मिळालेली नाही. आगामी काळात पाच जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एक जागा मिळेल, अशी आशा असल्याचे आठवले यांनी सांगितले. त्याचप्रमाणे दोन शासकीय महामंडळाचे अध्यक्षपद देखील पक्षाला मिळावे अशी आपली मागणी असून त्यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. रिपब्लिकन पक्ष हा छोटा असला तरी देखील तो महायुतीचा घटक पक्ष आहे.

# पुणे जिल्ह्याचा आर्यन प्रो कबड्डीच्या मैदानात

## महाराष्ट्रातील पहिला 'न्यू यंग प्लेयर' म्हणून तेलुगू टायटन्सकडून खेळणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. बाणेर येथील २१ वर्षीय आर्यन नम्रता अशोक ढवळे याची प्रो कबड्डी लीगच्या १३ व्या आणि १४ व्या हंगामासाठी तेलुगू टायटन्स संघात 'न्यू यंग प्लेयर' म्हणून निवड झाली आहे. यावर्षी महाराष्ट्रातून प्रो कबड्डीमध्ये स्थान मिळवणारा तो पहिलाच अष्टपैलू खेळाडू ठरला आहे.

आर्यनचे कुटुंबच कबड्डीमय आहे. वडील अशोक ढवळे आणि आई नम्रता ढवळे दोघेही आपल्या काळातील उत्तम कबड्डीपटू होते. घरातूनच मिळालेला खेळाचा वारसा आणि शिस्त आर्यनच्या यशाचा पाया ठरली. वडिलांनी दिलेली खेळाची शिस्त आणि आईने घेतलेली अहोरात्र मेहनत यामुळे आर्यनचा प्रवास घडला. बालपणापासूनच मातीच्या मैदानावर घाम गाळताना अनेकवेळा दुखापतींना सामोरे जावे लागले. मात्र जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने प्रत्येक अडथळा पार केला.

जिल्हा, राज्य आणि नंतर राष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याने सातत्याने चमकदार कामगिरी केली. विशेषतः रेडिंगमधील वेगवान चपळाई आणि डिफेन्समधील भक्कम पकड यामुळे तो प्रशिक्षकांच्या नजरेत भरला. अष्टपैलू खेळाडू म्हणून दोन्ही विभागांत सारखाच प्रभावी ठरल्याने प्रो कबड्डीच्या स्काऊट्सचे लक्ष त्याच्याकडे वळले.



सध्या आर्यन बाणेर येथील बाबूराव सोशल फाउंडेशनच्या 'सतेज संघा'कडून नियमित सराव करतो. यावर्षी त्याने राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत त्याने सुवर्णपदक पटकावत आपली गुणवत्ता सिद्ध केली. मैदानावरील आक्रमकता, सामन्याचे वाचन करण्याची क्षमता आणि संघभावना यामुळे तेलुगू टायटन्स संघाने त्याच्यावर विश्वास दाखवला.
सतेज संघाचे प्रशिक्षक आणि सहकारी खेळाडूंनी आर्यन चे अभिनंदन केले. आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि महाराष्ट्राच्या मातीतून मिळालेली ताकद यामुळे मी इथपर्यंत पोहोचलो. तेलुगू टायटन्सकडून खेळताना पुण्याचे, महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव मोठे करायचे आहे, अशी भावना आर्यनने व्यक्त केली.कष्ट, शिस्त आणि कुटुंबाच्या पाठिंब्याच्या बळावर मातीच्या मैदानातून थेट प्रो कबड्डीच्या चमकदार मॅटपर्यंत पोहोचलेला आर्यन आज राज्यातील हजारो तरुण खेळाडूंसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. त्याच्या या निवडीमुळे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनेक मुले कबड्डीकडे नव्या उमेदीने वळतील, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला. तेलुगू टायटन्स संघातून खेळताना आर्यनची कामगिरी कशी होते याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान
# थेरगाव ग्रामपंचायत कर्जत तालुक्यात प्रथम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात कर्जत तालुक्यात थेरगाव ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावला. नुकतेच धारूर येथील पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज मध्ये सहभागी झालेल्या एकूण २१ ग्रामपंचायतीस भेट देत मूल्याकन केले होते. यात थेरगाव ग्रामपंचायतीने सर्व निकष पूर्ण करीत बाजी मारल्याचे समजताच ग्रामस्थांनी जल्लोष केला.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात कर्जत तालुक्यातील एकूण २१ ग्रामपंचायतीने सहभाग नोंदविला होता. यात थेरगाव (ता.कर्जत) ग्रामपंचायतीने कर्जत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवल्याची माहिती कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी आणि ग्रामविकास अधिकारी महेश जगताप यांनी दिली. लोकसहभाग, स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षलागवड, महिला सक्षमीकरण, श्रमदान, आणि गावाच्या समृध्दीसाठी सर्वांनी दाखविलेल्या सामंजस्यपणा, एकीचे बळ म्हणून गावाला हा सन्मान मिळाल्याचे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गुंजाळ, कर्जतचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांच्यासह कर्जत पंचायत समितीचे पथक यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सुचनेमुळे गावाच्या समृध्दीसाठी विकासक दृष्टी, यात ग्रामस्थांना सोबत घेत काम करण्याची भूमिका आणि माझं गाव, माझी ग्रामपंचायत, सुंदर, हरित, स्वच्छ आदर्श गाव या संकल्पनेत स्वच्छता अभियान, जलसंवर्धन, लोकसहभाग, महिला सक्षमीकरण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा या विकासात्मक उपक्रमांवर ग्रामपंचायतीने सातत्याने काम केले. यातील प्रत्येक उपक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने गावात एकजूट निर्माण झाली असून त्याचेच फलित म्हणून हा सन्मान मिळाल्याची भावना थेरगाव ग्रामस्थांनी व्यक्त केली.



**कर्जत तालुक्यातील २१ ग्रामपंचायतीमधून थेरगाव ग्रामपंचायतची बाजी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात कर्जत तालुक्यातील मिरजगाव, बहिरोबावाडी, बाभूळगाव खालसा, बेळगाव, दुधोडी, दुरगाव, कुळधरण, कानगुडेवाडी, मलठन, राक्षसवाडी बुद्रुक, टाकळी खंडेश्वरी, मुळेवाडी, बारडगाव सुद्रीक, भांबोरा, खेड, म्हाळगी, निमगाव डाकू, पाटेगाव, वालवड आणि थेरगाव या २१ ग्रामपंचायतीने सहभाग नोंदविला होता. यात सर्व निकषांवर उत्कृष्ट काम करीत मूल्याकनात थेरगावने बाजी मारत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.

**लोकसहभागाच्या जोरावर विकासाकामाने पुरस्कार : जगताप**

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन यांच्यासह थेरगावचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य तसेच आजी-माजी चेअरमन, व्हाईस चेअरमन, ग्रामपंचायत कर्मचारी आणि थेरगावच्या जनतेच्या लोकसहभागातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात थेरगाव ग्रामपंचायतीने कर्जत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. गावाचे रुपडे बदलण्यात प्रत्येकाचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले अशी प्रतिक्रिया थेरगावचे ग्रामविकास अधिकारी महेश जगताप यांनी दिली.

# द • ख • ल

## चापडगावात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे जल्लोषात स्वागत; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



**अहिल्यानगर :** उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांचे कर्जत तालुक्यातील चापडगाव येथे आज उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त चौंडी येथे आयोजित कार्यक्रमासाठी जात असताना हा स्वागत सोहळा पार पडला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवती प्रदेशाध्यक्षा कु. संध्या सोनवणे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या स्वागत कार्यक्रमात स्थानिक महिला कार्यकर्त्या, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. महिलांनी पुष्पगुच्छ देऊन सुनेत्रा पवार यांचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनेत्रा पवार यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधत त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. त्यांच्या आगमनामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महिलांनी त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याबद्दल सकारात्मक भावना व्यक्त केल्या. स्वागत कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होता. चापडगाव परिसरात घोषणाबाजी, स्वागत फलक आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

## राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक महान व आदर्श प्रशासिका : राऊत



**माहिजळगाव :** भारताच्या इतिहासातील आदर्श राज्यकर्त्या, लोककल्याणकारी शासिका व सामाजिक न्यायाच्या पुरस्कर्त्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती माहिजळगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित राऊत यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना रणजित राऊत म्हणाले की, राजमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ एक महान राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या आदर्श प्रशासिका, न्यायप्रिय शासिका आणि लोकहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या दूरदृष्टीच्या राज्यकर्त्या होत्या. त्यांच्या कारकीर्दीत प्रजेच्या कल्याणासाठी अनेक विकासकामे करण्यात आली. देशभरातील मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा आणि सार्वजनिक सुविधांच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच सामाजिक समतेसाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा समाजाने आदर्श घ्यावा, असे मत व्यक्त केले. या प्रसंगी गावातील नागरिक, युवक-युवती, महिला, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निंबवी -गावडेमळा-कमळाई नकाशावरील रस्त्याचे यशस्वी सीमांकन



**लिंपणगाव :** श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे, भूमी उपाधीक्षक अविनाश मिसाळ तसेच शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे मार्गदर्शक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निंबवी येथील गावडे मळा-कमळाई नकाशावरील रस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले. मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन रस्त्याचे सीमांकन पूर्ण केले. तलाठी समीर कुसेकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या ऐतिहासिक कार्यावेळी दादासाहेब जंगले पाटील, ॲड. गोरख कडूस, जालिंदर कातोरे, रामचंद्र अडसरे गुरुजी, सरपंच शिर्के, आप्पासाहेब शिर्के, हिरामण शिर्के, नामदेव शिर्के, आनंदा गावडे, स्वप्नील लोखंडे, लक्ष्मण महाडीक, अनिल शिर्के, दिलीप शिर्के, अतुल धानगुडे, पांडुरंग गावडे, सुनील गावडे व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर सीमांकन प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात आणि सर्व संबंधितांच्या सहकार्याने यशस्वीपणे पूर्ण झाली. शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यांसाठी सुरू असलेल्या या मोहिमेत स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ, महसूल प्रशासन आणि चळवळीच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल निंबवी गावच्यावतीने सर्वांचे सरपंच काका शिर्के यांच्याकडून आभार व्यक्त करण्यात आले.

## वाघमारे, राऊत, डॉ. चव्हाण महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित



**लिंपणगाव :** अजिंक्य सोशल फौंडेशन पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र दिना निमित्त राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव 'शिक्षक रत्न 'पुरस्कार तालुक्यातील मांडवगण येथील उपक्रमशिल शिक्षक राजेंद्र वाघमारे, संगिता राऊत व डॉ. संध्या चव्हाण यांना संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज शिवाजी महाराज मोरे, डॉ. अशोक सोनवणे, डॉ. राजेंद्र मोरे, नगरसेवक ॲड. विनायक गायकवाड, फौंडेशनचे अध्यक्ष सचिन पवार, उपाध्यक्षा संगिता भालेराव, सदस्य बाळासाहेब राठोड यांचे शुभहस्ते लोकनेते लक्ष्मणराव जगतापसभागृह पिंप्री चिंचवड येथे प्रदान करण्यात आला. डॉ. संध्या विजय चव्हाण यांनी महाविद्यालयात शिक्षणशास्त्र विषयात एम फिलच्या आठ व पीएच. डी च्या पाच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. एम फिल व पीएच. डी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी पाच पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. तसेच संशोधनपर तीस पेपर त्यांचे राष्ट्रीय व राज्य स्तरावर प्रकाशित झाले आहेत. विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन, व्याख्याने व कृती कार्यशाळेचे आयोजन, तसेच वृक्षारोपन व वृक्ष संवर्धन आदि उपक्रम त्यांनी राबवले आहेत. राजेंद्र वाघमारे यांनी शाळेतील वंचित विद्यार्थ्यांसाठी बचत बँक, पाठांतर स्पर्धा, उपस्थिती वाढविण्यासाठी बक्षीस योजना आदि उपक्रम शाळेत राबविले. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक
## जातेगाव-महारुळीत शिवसेनेच्या शाखांचे उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रेरणेने तसेच पक्ष सचिव रामजी रेपाळे व पक्ष सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड तालुक्यातील जातेगाव व महारुळी येथे शिवसेनेच्या नव्या शाखांचे उद्घाटन उत्साहात झाले. या कार्यक्रमास शिवसेना जिल्हाध्यक्ष बाबूशेठ टायरवाले व युवा नेते आकाश बाफना यांच्या हस्ते उद्घाटन झाले

जामखेड तालुक्यातील युवकांचा वाढता कल शिवसेनेकडे पाहून जामखेड तालुका शिवसेना पक्षांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.याउद्घाटन सोहळ्यास ज्येष्ठ नेते कैलास जाधव, तालुका उपप्रमुख नितीन कोल्हे, शहरप्रमुख मोहन देवकाते, शहर उपप्रमुख किरण मराळ, खर्डा गटाचे नेते श्याम गोलेकर, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष शिवकुमार डोंगरे, जवळा कक्ष प्रमुख कुलदीप पवार, विकी पिंपळे यांच्यासह शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, युवासेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जिल्हाध्यक्ष बाबूशेठ टायरवाले यांनी शिवसेनेची विचारधारा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासकामांची माहिती दिली.शिवसेना ही सर्वसामान्य जनतेची पक्षसंघटना असून पक्षाची विचारधारा व विकासकामे घराघरात पोहोचविण्यासाठी गावागावांत शाखा विस्तार सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. जवळा गटातून अल्पवधीतच नितीनजी कोल्हे यांच्या अहोरात्र समाजकार्यातून एक मोठी ताकद शिवसेनेचे निर्माण झालेली आहे तसेच खर्डा गटातून जुने जाणकार शिवसैनिक माजी पंचायत समिती सदस्य कैलास अण्णा जाधव यांच्यामार्फत ही शिवसेना संघटन मजबुतीवर विशेष भर देण्यात आलेला आहे तसेच इतरही सर्व पदाधिकारी यांचे बहुमोल असे कार्य पाहून लवकरच शिवसेनेचा विस्तार जामखेड तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात होईल असा विश्वास सर्व शिवसैनिकांच्या मनामध्ये रुढ झाला आहे. शाखा उद्घाटन नंतर संपूर्ण ग्रामस्थांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम तालुका शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होता

यावेळी बोलताना आकाश बाफना म्हणाले,जामखेड तालुक्यातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. लवकरच तालुक्यातील पदाधिकारी व शिवसैनिकांचा मेळावा आयोजित करून संघटना अधिक मजबूत करण्यात येईल. सर्वांच्या मार्गदर्शनाखाली एकत्रितपणे काम करत पक्षाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करु.

जातेगाव शाखेची पदाधिकारी निवड: शिवसेना शाखाप्रमुखपदी किरण गायकवाड, युवासेना शाखाप्रमुखपदी महादेव गायकवाड, शिवसेना उपशाखाप्रमुखपदी नंदकुमार गायकवाड तर युवासेना उपशाखाप्रमुखपदी अजय गायकवाड यांची निवड करण्यात आली. शाखेच्या सदस्यांमध्ये किरण गायकवाड, अजय गायकवाड, शंकर गायकवाड, बालाजी गायकवाड, नितीन गायकवाड, अशोक गायकवाड, कृष्णा गायकवाड, शहाजी गायकवाड, काका गायकवाड, राजेश गायकवाड, नंदकुमार गायकवाड, महादेव गायकवाड, नवनाथ गायकवाड, अक्षय गायकवाड, गोरख गायकवाड, हरिदास गायकवाड, बाळू गर्जे, रवी गायकवाड, विष्णू गायकवाड, संतोष गायकवाड आणि शेषेराव गायकवाड यांचा समावेश आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना विनम्र अभिवादन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** याठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्ताने त्रिदिनी कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिजभैय्या नरेंद्रजी घुले पाटील साहेब उपस्थित राहून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून समाजहित, जनकल्याण, धर्मस्थळांचे जतन आणि न्यायपूर्ण प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. त्यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे असून, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच खरी आदरांजली ठरेल.

याप्रसंगी नाना पाटील मडके अनिलराव मडके, गणेशराव खंबरे, एकनाथजी कसाळ, अशोकराव मेरड,हनुमानजी पातकळ, राहुलजी बेडके, जाकीरभाई कुरेशी, जमीरजी पटेल, मनोजजी तिवारी नगरसेवक संतोषजी जाधव महेशजी फलके,गणेशराव कोरडे, विक्रांतभैय्या लांडे, यश गाडे, सोमनाथ वीर, आप्पासाहेब वीर,यांसह पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती शेवगाव शहर व तालुका सर्व सदस्य आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने भाविक भक्त समाज बांधव आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## सोलर योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा : दिवेकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी महावितरण शेवगाव उपविभागा मार्फत ढोरजळगाव कार्यालया अंतर्गत येणाऱ्या एकूण १३ गावात शंभरच्या कमी वापर असणारे १६६० ग्राहक असून राज्य शासनाच्या स्वयंपूर्ण सोलर योजनेचा लाभ घेतल्यास ग्राहकाला शून्य लाईट बिल येऊन राज्याच्या ऊर्जा बचतीस फायदा होईल त्यामुळे ग्राहकांनी शासनामार्फत सबसिडीचा फायदा घ्यावा असे आवाहन ढोरजळगाव उपकेंद्राचे कनिष्ठ अभियंता विकास दिवेकर यांनी केले आहे.

**ढोरजळगाव :** वीज महावितरण कंपनीच्या वतीने राज्यातील घरगुती वीज ग्राहकांसाठी महाराष्ट्र स्वयंपूर्ण सोलर योजना सुरू केली असून या योजनेअंतर्गत केंद्र व राज्य सरकारकडून भरीव अनुदान उपलब्ध होणार असल्याने सदर योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महावितरण च्या वतीने करण्यात आले आहे.

वाढत्या वीज बिलामुळे त्रस्त झालेल्या सर्वसामान्य नागरिकांसाठी केंद्र शासनाच्या पीएम सूर्य घर योजनेसह शासनाच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र निवासी रूट ऑफ स्मार्ट सोलर योजने मुळे महावितरणच्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार असून. यासाठी ग्राहकांना मोठे अनुदान मिळणार आहे. महावितरण च्या माहितीनुसार १ किलोवॅट सोलर प्रणालीची एकूण किंमत पन्नास हजार रुपये असून यामध्ये केंद्र शासनाच्या वतीने तीस हजार रुपये तर राज्य शासनाच्या वतीने ग्राहक प्रवर्गानुसार दहा हजार ते सतरा हजार पाचशे रुपये पर्यंत अतिरिक्त सहाय्य मिळणार आहे त्यामुळे ग्राहकांना अत्यल्प पैसे भरून सोलर प्रणाली बसविता येणार आहे. यासाठी मागील वर्षभरातील वीज वापर १०० युनिट किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. १ किलोवॅट सोलर प्रणाली मधून महिन्याकाठी ९० ते १२० युनिट वीज निर्मिती होऊ शकते.

## शहराचा विकास कुटुंबाप्रमाणे करण्यासाठी कटिबद्ध : आव्हाड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरात सुमारे चाळीस वर्षांपूर्वी नगरपरिषदेची स्थापना झाली. या शहराच्या जडणघडणीत अनेकांनी योगदान दिले. अनेकांनी या शहराचा कारभार चांगल्या पद्धतीने संभाळून शहराची पायाभरणी केली. शहराच्या विकासाबरोबरच सामाजिक सलोखा ठेवला. माजी आमदार, खासदार पालकमंत्री यांनी शहर विकासासाठी दूरदृष्टीने मोठे सहकार्य केले. आ. मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासाची कामे सुरू असून, शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमांतून भरीव निधी उपलब्ध होत आहे. शहराचा विकास आपल्या कुटुंबाप्रमाणे करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले. पाथर्डी नगरपरिषदेचा ४१ वा स्थापना दिन काल शनिवारी (दि.३० मे) नवीन नगरपरिषद कार्यालय इमारतीच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दि. ३० मे १९८५ रोजी थापन झालेल्या नगरपरिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पालिका कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे ८० कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरच्या टीमकडुन करण्यात आली. या कार्यक्रमात मान्यवरांचा सत्कार तसेच नगरपरिषदेत सेवा बजावून अन्यत्र कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, जेष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, माजी उपनगराध्यक्ष बजरंग घोडके, सभापती बंडूशेठ बोरुडे, सुभाष बोरुडे, संजय देशमुख, डॉ. जगदीश मुने, प्रतीक नांगरे, गटनेते देवा पवार, संजय भागवत, वंदना टेके, किरण खेडकर, मनीषा उदमले, ज्योती पवार, सविता भापकर, मंगल सोनटक्के, रेखा हंडाळ, मुख्याधिकारी संतोष लांडगे नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक आदी उपस्थित होते.



# सिस पे एजंटला पुन्हा मारहाण
## श्रीगोंद्यात मध्यरात्री थरार, विनानंबर कारमध्ये दोन तास अमानुष छळ
# पन्नास लाखांच्या खंडणीसाठी अपहरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यात सिस पे एजंटवर हल्ल्याच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसतानाच पुन्हा एकदा एका सिस पे एजंटला अपहरण करून मारहाण व ५० लाखांच्या खंडणीची मागणी करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे श्रीगोंदा तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सिस पे एजंट नेमके किती सुरक्षित? असा सवाल उपस्थित होत आहे.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे चार अनोळखी आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भरत बाबुराव खामकर (वय ५२, रा. टाकळी कडेवळीत) हे पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, पिंपळगाव पिसा येथे शिपाई म्हणून कार्यरत असून सिस पे एजंट म्हणूनही काम करतात. दिनांक २९ मे २०२६ रोजी मध्यरात्री १२.४५ वाजण्याच्या सुमारास श्रीगोंदा-काष्टी रोडवरील हॉटेल अनन्या परिसरातून आरोपींनी त्यांना जबरदस्तीने पांढऱ्या रंगाच्या विनानंबर मारुती सुझुकी कारमध्ये बसवून नेल्याचा आरोप आहे.

आरोपींनी फिर्यादीस पिंप्री कोलंदर परिसरातील कुकडी कालव्याजवळ नेऊन ५० लाख रुपये दे, नाहीतर जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिली. त्यानंतर तब्बल दोन तास लाथाबुक्क्यांनी, लाकडी काठी व दगडाने मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

इतक्यावरच आरोपी थांबले नाहीत. पुढे म्हसे शिवारातील निर्जन भागातील अर्धवट बांधकाम असलेल्या बंगल्यात फिर्यादीस डांबून ठेवत त्यांच्या नातेवाईकांना व्हॉट्सॲप कॉलद्वारे ५० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. मात्र नातेवाईक पोलिस स्टेशनला गेल्याची माहिती आरोपींना मिळताच त्यांनी फिर्यादीस उक्कडगाव शिवारात सोडून पलायन केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणामुळे तालुक्यात पुन्हा एकदा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सिस पे एजंटला पुन्हा मारहाण या घटनेने आर्थिक व्यवहार करणाऱ्या एजंटांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे.या प्रकरणाचा तपास सपोनि गणेश आहिरे करीत असून आरोपींचा शोध सुरू आहे.

**बनाव असण्याची शक्यता?**

श्रीगोंदा तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागात सिस पे च्या माध्यमातून अनेक गोर गरीब जनतेची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे त्यामुळे हे जिरवण्यासाठी हा प्रकार केला असल्याची शक्यता वर्तविण्यात येत असून लवकरच पोलीस तपासात उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही



दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.१ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# तीन अपत्य नियमाचा फटका; पिंपळे सोसायटीचे अध्यक्ष व संचालक अपात्र

## उपनिबंधकांचा आदेश; सहकार क्षेत्रात खळबळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील पिंपळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या अध्यक्षांसह एका संचालकाला तीन अपत्य नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी अपात्र ठरविण्यात आल्याने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ क-अ अंतर्गत हा आदेश दिला आहे. पिंपळे येथील राहुल राजेंद्र भोजने यांनी दाखल केलेल्या तक्रारीनंतर या प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली.




सुनावणीदरम्यान संबंधित पदाधिकाऱ्यांना नोटिसा बजावून त्यांचे म्हणणेही नोंदविण्यात आले. तसेच सादर करण्यात आलेल्या अधिकृत जन्मदाखल्यांची पडताळणी करण्यात आली. या तपासणीत संस्थेचे अध्यक्ष शिवनाथ निवृत्ती कोटकर आणि संचालक अण्णासाहेब शिवराम ढोणे यांना तीन अपत्य असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना संचालक पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले. उपनिबंधकांनी दिलेल्या आदेशानुसार या दोघांच्या जागा तत्काळ रिक्त झाल्या आहेत.

या निर्णयामुळे पिंपळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेतील सत्तासमीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सहकार क्षेत्रातही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू असून, विविध संस्थांमधील पदाधिकारी आणि संचालकांचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. दरम्यान, सहकार प्रशासनाने नियमांचे काटेकोर पालन करण्याचा संदेश या निर्णयातून दिल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

आगामी काळात अशा प्रकारच्या आणखी तक्रारी समोर येण्याची शक्यता वर्तविली जात असून, अनेक संस्थांमधील पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याची चर्चा आहे. या निर्णयानंतर संस्थेतील पुढील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता असून, रिक्त झालेल्या जागांबाबत कोणते निर्णय घेतले जातात याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# भाजपच्या खंडणीखोर कार्यकर्त्या विरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तुला येथे दुकान चालवयाचे असेल तर मला आठवड्याला १ हजार रुपये दयावे लागतील, तसेच मला चहा पाण्याच्या बाटल्या फुकट दिल्या नाहीतर तुला जिवे ठार मारुन टाकीन, असे म्हणत आरोपीने एका चहा हॉटेल मालकाला खंडणी मागून मारहाण केली. ही घटना राहुरी विद्यापीठ येथे दि. ३० मे रोजी सकाळी घडली. मनोज बबन तट, वय ३० वर्षे, हे राहुरी तालुक्यातील विद्यापीठ येथे राहत असून त्यांचे विद्यापीठाच्या प्रवेशद्वारा समोर येडेश्वरी टी सेंटर या नावाने चहा व नाश्त्याचे हॉटेल आहे. आरोपी कुंदन बाचकर हा नेहमी मनोज तट यांच्या हाँटेलवर जाऊन दमदाटी करून फुकट चहा व पाणी बॉटल घ्यायचा. तसेच त्याच्या मित्रांना देखील तेथे बोलावुन त्यांनाही फुकट चहा व पाणी पाजत असे. दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास हॉटेल मालक मनोज तट हे हॉटेलमध्ये असताना आरोपी कुंदन बाचकर हा तेथे गेला आणि म्हणाला की, तुला येथे दुकान चालवयाचे असेल तर मला आठवड्याला १ हजार रुपये द्यावे लागतील. तसेच मला चहा पाण्याच्या बाटल्या फुकट दिल्या नाहीतर तुला जिवे ठार मारुन टाकीन, आणी तुला येथे दुकान चालवुन देणार नाही, तुला माहित आहे का मी कोणाचा माणुस आहे, असे म्हणुन धमकी दिली. तसेच फुकट चहाची मागणी केली. तेव्हा मनोज तट यांनी त्यास फुकट चहा देण्यास नकार दिला. तेव्हा आरोपीने मनोज तट व त्यांची आई मंगल तट या दोघांना शिवीगाळ करुन हाताने व दगडाने मारहाण करुन जखमी केले. त्यानंतर हाँटेलमधील कप, काचेचे ग्लास तसेच काऊंटरची तोडफोड करुन त्याचे नुकसान केले. भांडणामध्ये आरोपीने मनोज तट यांच्या खिशातील ५ हजार ३०० रुपये रोख रक्कम व मोबाईल बळजबरीने काढून घेतला. मनोज बबन तट यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी कुंदन पाटीलबा बाचकर, रा. गोटूंबे आखाडा, ता. राहुरी, याच्यावर मारहाण, धमकी व खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच आरोपी कुंदन बाचकर याला पोलिस पथकाने पकडुन गजाआड केले. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार विकास वैराळ हे करीत आहे.

# समृद्धी महामार्गावर पोलिसांवर दरोडेखोरांकडून दगडफेक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गावर प्रवाशांची लूटमार करणाऱ्या आणि डिझेल चोरी करणारी टोळी बाभळेश्वर महामार्ग पोलीस केंद्राच्या पथकाने आज, शनिवारी पहाटे पाठलाग करून उघडकीस आणली. पोलिसांनी एका संशयित दरोडेखोराला अटक केली. गुन्ह्यातील विनाक्रमांकाची मोटार, डिझेलचे कॅन, घातक शस्त्रे जप्त केली. पाठलाग करताना दरोडेखोरांनी पोलिसांवर दगडफेकही केली. अमोल नाना वैद्य (वय २० वर्षे, रा. कोऱ्हाळे, राहाता) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला कोपरगाव न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली. ही माहिती कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदिप कोळी यांनी दिली. समृद्धी महामार्गावर चॅनेल क्रमांक ५०८ जवळ एका बंद पडलेल्या मोटारीतील प्रवाशांना दरोडेखोर लुटत असल्याची माहिती नियंत्रण कक्षाकडून गस्ती पथकाला मिळाली. महामार्ग पोलीस घटनास्थळी पोहोचले, मात्र तोपर्यंत दरोडेखोर दोन वाहनांमधून पसार झाले होते. संशयित वाहन चॅनेल क्रमांक ५१० जवळ पोलीसांना आढळले. पोलिसांना पाहताच आरोपींनी मोटार नाशिककडे पळवली. पाठलागदरम्यान आरोपींनी पोलिसांच्या गाडीवर चालत्या वाहनातून जोरदार दगडफेक केली. त्याचवेळी आरोपींच्या साथीदारांनी विनाक्रमांक दुसऱ्या मोटारीने पोलीस वाहनाचा रस्ता अडवला. याचा फायदा घेऊन एक मोटार पसार झाली, तर मोटार 'राँग साईड'ने पळून गेली. यांची माहिती मिळताच बाभळेश्वर केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक विक्रांत कचरे यांना सकाळी ६.४५ वा. एका ट्रक चालकाला ७ जणांनी मारहाण करून लुटल्याचा दूरध्वनी आला. पोलीस तिथे पोहोचले असता, त्याच दोन्ही मोटारीतील दरोडेखोरांनीच हे कृत्य केल्याचे समोर आले. पोलिसांच्या शोधात चॅनेल क्रमांक ५२० जवळ मोटार एका मालट्रकमधून डिझेल चोरी करताना सापडले. पोलिसांना पाहताच आरोपींनी प्रचंड वेगाने मोटार पळवली. महामार्ग पोलिसांनीही जीवाची परवा न करता पाठलाग केला. अखेर धोत्रे शिवारात (कोपरगाव चॅनेल क्र. ५०४) आरोपींनी गाडी रस्त्याच्या कडेला थांबवत लोखंडी जाळीच्या कुंपणावरून उड्या मारून शेतात पळ काढला. पोलिसांनीही कुंपणावरून उड्या मारत एकाला पकडले, तर त्याचे ६ साथीदार पसार झाले. पोलिसांना पकडलेल्या मोटारीत डिझेलने भरलेले ११ कॅन (अंदाजे ३८५ लीटर डिझेल) जप्त केले. या कारवाईत बाभळेश्वर महामार्ग केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक विक्रांत कचरे, अंमलदार अनिल चव्हाण, अनिल उजागरे, किरण कुऱ्हे आकाश पवार, नामदेव सोळंके यांच्या पथकाने सहभाग घेतला.

# पैसे देण्यात नकार दिला म्हणून पती-पत्नीला मारहाण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : पैशाची मागणी केली असता पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी दोघा पती पत्नीला शिवीगाळ करुन काठी व रॉडने मारहाण केल्याची घटना दि. ३० मे रोजी राहुरी विद्यापीठ येथे घडली. कुंदन पाटीलबा बाचकर, (वय २८, रा. गोटूंबे आखाडा, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी ६.४५ वाजे दरम्यान कुंदन बाचकर यांना अहिल्यानगर येथे जायचे असल्याने ते बसची वाट पाहत विद्यापीठच्या बस स्टॉप जवळ थांबले होते. येथील हाँटेल वाला मनोज तट याने कुंदन बाचकर यांच्याकडे पैसाची मागणी केली. तेव्हा बाचकर यांनी त्याला पैसै देण्यास नकार दिला. तेव्हा आरोपींनी बाचकर यांना शिवीगाळ करुन काठ्या व रॉडने मारहान केली. सुरीने मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा कुंदन बाचकर यांनी त्यांच्या पत्नीला फोन करुन तेथे बोलावुन घेतले.

आरोपींनी त्यांना देखील शिवीगाळ करुन रॉडने मारहान केली. तसेच कुंदन बाचकर यांच्या गळ्यातील दिड तोळा वजनाची सोन्याची चैन व ७ हजार रुपये रोख रक्कम आरोपींनी काढून घेतली. कुंदन पाटीलबा बाचकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी मनोज बबन तट, बबन तट, दोघे रा. फार्मा कॉर्टर, डिग्रस, ता. राहुरी तसेच मनोज बबन तट याचा भाचा अशा तिघांवर शिवीगाळ व मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेनंतर पोलीस पथकाने आरोपी मनोज तट यास ताबडतोब ताब्यात घेऊन गजाआड केले. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात पोलिस नाईक गणेश सानप हे करीत आहे.

# कारागृहातील कैद्यांना जेवण पुरविणाऱ्यांकडून दारु जप्त ; गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी पोलीस ठाण्याच्या कारागृहातील कैद्यांना जेवण पुरविणाऱ्या व्यक्तीकडूनच दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारागृहातील कैद्यांना नियमित जेवण पुरविणाऱ्या व्यक्तीच्या हालचाली पोलिसांना संशयास्पद वाटल्याने त्याची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान त्याच्याकडे दारूच्या बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी त्या बाटल्या जप्त केल्या. कारागृहातील कैद्यांपर्यंत दारू पोहोचविण्याचा प्रयत्न झाला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राहुरी पोलिसांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून चौकशी सुरू केली आहे.

# पुणतांबा-श्रीरामपूर मार्गावर झाडे पेटविण्याचे प्रकार वाढले; वृक्षप्रेमींमध्ये संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : पुणतांबा-श्रीरामपूर या सुमारे १९ किलोमीटर लांबीच्या राज्य मार्गावर रस्त्यालगत असलेल्या झाडांच्या खोडाजवळील वाळलेला पाला पेटवून देण्याचे प्रकार वाढल्याने परिसरातील वृक्षप्रेमींमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या प्रकारामुळे झाडांच्या मुळांना व खोडाला गंभीर नुकसान होत असून, काही दिवसांनी झाडे वाळल्यानंतर त्यांची तोड केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कोपरगाव-पुणतांबा-श्रीरामपूर हा महत्त्वाचा राज्य मार्ग असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूंना १५ मीटरपर्यंतची जागा विभागाच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट करणारे फलकही ठिकठिकाणी लावले आहेत. या हद्दीतील झाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची असतानाही त्यांचे संरक्षण होत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

खैरी, निमगाव आणि चितळी परिसरात काही ठिकाणी झाडे जेसीबीच्या साहाय्याने मुळासकट उपटण्यात आल्याचे दिसून येत आहे. तसेच रस्त्यालगत वृक्षतोडीचे प्रमाणही वाढल्याचे निदर्शनास आले आहे. झाडांच्या खोडाजवळील वाळलेला पाला जाळल्याने निर्माण होणाऱ्या उष्णतेचा परिणाम झाडांवर होत असून, त्यामुळे अनेक झाडे हळूहळू सुकत असल्याचे वृक्षप्रेमींचे म्हणणे आहे.

या प्रकारामुळे पर्यावरणाची हानी होत असून, रस्त्यालगतची हिरवाई धोक्यात आली आहे. झाडे तोडणारे तसेच जाणीवपूर्वक आग लावून नुकसान करणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पुणतांबा परिसरातील वृक्षप्रेमी आणि नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. तसेच रस्त्यालगतच्या झाडांचे संरक्षण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची मागणीही होत आहे.

# पारगाव सुद्रिकमध्ये भरदिवसा महिलेचा कान तोडून दागिने लांपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथे भरदिवसा धक्कादायक चोरीची घटना घडली. चोरट्याने घरात घुसून महिलेच्या अंगावरील तब्बल ८० हजार रुपयांचे दागिने हिसकावून नेले . विशेष म्हणजे चोरट्याने महिलेच्या कानातील कर्णफुले ओरबाडून नेताना महिलेचा कान फाटून गंभीर दुखापत झाली. जखमी महिलेला तातडीने काष्टी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भेटीचे वातावरण पसरले असून सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गणपत नामदेव हिरवे यांच्या घराच्या जिन्याजवळील दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरात असलेल्या मंदाबाई गणपत हिरवे यांच्या अंगावरील मनी-मंगळसूत्र, कर्णफुले व अंगठी असा सुमारे ८० हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने ओरबाडून नेला.दरम्यान, चोरट्याने कानातील फुले हिसकावताना मंदाबाई हिरवे यांच्या कानाला गंभीर दुखापत झाली. कान फाटल्याने त्यांना तातडीने काष्टी येथील लोकमान्य हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दार उघडे दिसले आणि चोरट्याने थेट डाव साधला, अशी चर्चा गावात सुरू असून महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिसांच्या गस्तीसंदर्भातही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोहर खिळदकर हे करीत आहेत.

# निंभोरे फाटा परिसरातील वनक्षेत्राला आग; तत्परतेमुळे मोठी हानी टळली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी शिवारालगत राहुरी तालुक्यातील निंभोरे फाटा परिसरातील वनविभागाच्या डोंगराळ क्षेत्राला रविवारी आग लागल्याची घटना घडली. नागरिक आणि वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे आग वेळीच आटोक्यात आल्याने मोठी पर्यावरणीय हानी टळली. निंभोरे फाट्याजवळील राळराशी परिसरातील सुमारे १५० एकर क्षेत्र असलेल्या वनक्षेत्रातील डोंगराला आग लागल्याची माहिती बाळासाहेब भागवत डोळे यांनी दिली.



त्यानंतर झरेकाठी जनसेवा युवा मंचचे सदस्य जयदीप बापूसाहेब तोंडे व सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे यांनी तातडीने राहुरी वनविभागाचे कर्मचारी सिनारे यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी सिनारे, डॉ. ललितकुमार सिनारे, जनसेवा युवा मंचचे सदस्य जयदीप तोंडे तसेच सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार सोमनाथ डोळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. सर्वांनी मिळून आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. आगीने काही काळ भीषण स्वरूप धारण केले होते.

आग अधिक पसरली असती तर डोंगरावरील मोठ्या प्रमाणातील वनसंपदा व झाडांचे नुकसान होण्याची शक्यता होती. मात्र संबंधितांनी वेळीच केलेल्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले.

या धाडसी व तत्पर कार्याबद्दल परिसरातील नागरिकांकडून वनविभागाचे कर्मचारी तसेच आग विझविण्यासाठी पुढाकार घेतलेल्या सामाजिक कार्यकर्ते आणि युवा मंचाच्या सदस्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# कोल्ही शिवारात बस-कारचा भीषण अपघातात

## पाच जण प्रवासी जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : सिल्लोडहून नाशिक प्रवास करणारी सिल्लोड आगाराची एसटी बस वैजापूरच्या दिशेने येत असताना कोल्ही शिवारात भरधाव कारने बसला समोरून धडक दिली. सदरची घटना रविवारी (ता. ३१) रोजी सकाळच्या सुमारास कोल्ही शिवारात घडल्याने या अपघातात कारमधील पाच प्रवासी व बसचालक जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी तालुक्यातील वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यापैकी कारमधील दोन प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यांना प्राथमिक उपचार करून अधिक पुढील उपचारासाठी सोडून आले आहे.



मिळालेल्या अधिक माहितीनुसार, एमएच २० बीएल ३७७९ क्रमांकाची सिल्लोड-नाशिक एसटी बस वैजापूरच्या दिशेने येत होती.बसमध्ये एकूण ४६ प्रवासी प्रवास करत होते. दरम्यान नाशिक छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग ७५२ क वर कोल्ही शिवारात भरधाव वेगाने शिऊरच्या दिशेने येणाऱ्या कार क्रमांक चक१२ ऋ्य ९२२० ने बसला समोरून धडक दिली.या अपघातात कारमधील पाच प्रवासी जखमी झाले तर, बसचालक हे किरकोळ जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

जखमींमध्ये विजय रेडी (वय ४७ रा. घोरपडी पुणे), धनंजय मधुकर पाटील (वय ५२ रा.घोरपडी पुणे), कोकिळाबाई प्रभाकर सोनार (वय ६५ रा. धुळे), ललिता मधुकर पाटील (वय ४८ रा.घोरपडी पुणे) आणि उर्मिला धनंजय पाटील (वय ४० रा.घोरपडी पुणे) हे कारमधील पाच प्रवासी जखमी झाले आहे.यापैकी धनंजय व विजय हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना अधिक उपचारांची गरज असल्याने प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी रेफर करण्यात आले आहे.

अपघातात बस चालक शंकरसिंग शेवगण हे देखील किरकोळ जखमी झाले असल्याची माहिती मिळाली आहे.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने मदतकार्य करत जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.घटनेची शिऊर पोलिसांत नोंद करण्यात आली आहे.अपघात घडला तेव्हा बसमध्ये एकूण ४६ प्रवासी होते. सुदैवाने बस मधील सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

# अंगणवाडीसेविका ११ प्रकारची कागदी रजिस्टर्स बंद

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : राज्यातील अंगणवाडीसेविका आणि मदतनीसांना प्रशासनाने एक मोठा दिलासा दिला आहे. अंगणवाडी केंद्रांमधील ११ प्रकारची पारंपरिक कागदी रजिस्टर्स आता पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाने घेतला आहे. यापुढे अंगणवाडीतील सर्व प्रकारची माहिती केवळ 'पोषण ट्रॅकर' या डिजिटल प्रणालीवरच नियमितपणे नोंदवणे अनिवार्य करण्यात येणार आहे. केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्या निर्देशानुसार ही नवी पारदर्शक व्यवस्था संपूर्ण राज्यात लागू करण्यात येत आहे. या संदर्भात आयुक्तालयाने एक विशेष परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात येणार आहेत.




प्रत्येक अंगणवाडी केंद्रात दैनंदिन स्तरावर निरीक्षण करून या डिजिटल प्रणालीचा वापर व्यवस्थित सुरू आहे की नाही, यावर काटेकोर लक्ष ठेवण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून अंगणवाडीसेविका आणि मदतनीसांचा मोठा वेळ विविध प्रकारच्या कागदी नोंदी आणि रजिस्टर्स भरण्यातच जात होता. यामध्ये प्रामुख्याने गर्भवती महिलांची नोंद, धात्री मातांची नोंद, तसेच शून्य ते सहा महिने, सहा महिने ते तीन वर्षे आणि तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या नोंदी स्वतंत्रपणे ठेवाव्या लागत होत्या. याशिवाय दैनंदिन निरीक्षण नोंद, अन्नधान्य वितरण नोंद आणि इतर अनेक कागदोपत्री कामे करावी लागत असल्याने, अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला होता. या अवाजवी कागदी कामांमुळे बालकांचे प्राथमिक शिक्षण, त्यांचे पोषण आणि सर्वांगीण विकास या मूळ जबाबदाऱ्यांकडे पुरेसे लक्ष देता येत नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या.

या निर्णयामुळे आता ही सर्व कागदी कामे इतिहासजमा होणार आहेत. अंगणवाडी सेविकांना डिजिटल प्रणालीचा आधार मिळाल्यामुळे त्यांचा प्रशासकीय कामांवरील वेळ वाचणार आहे. हा वेळ आता प्रत्यक्ष लाभार्थी बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी, त्यांच्या पोषणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि त्यांच्या प्राथमिक शिक्षणासाठी वापरता येणे शक्य होईल. या डिजिटल सुधारणेमुळे संपूर्ण अंगणवाडी व्यवस्थापन अधिक पारदर्शक, गतिमान आणि प्रभावी होईल, तसेच राज्यातील हजारो अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा ताण कमी होऊन त्यांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.